# दिनांक 22/08/2022 रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त

---

सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी प्रत्यक्ष तसेच दूरचित्रवाणी (Video Conference) द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | प्रतिनिधी जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| 4. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| 5. | विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 6. | प्रतिनिधी सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| 7. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| 8. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| 9. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| 10. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 11. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| 12. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| 13. | मुख्याधिकारी, नगर परिषद रत्नागिरी | सदस्य |
| 14. | मुख्याधिकारी, नगर परिषद खेड | सदस्य |
| 15. | प्रतिनिधी मुख्याधिकारी, नगर परिषद गुहागर | सदस्य |
| 16. | डॉ. ए.सी.ठाकूरदेसाई, प्राचार्य, गोगटे जोगळेकर कॉलेज रत्नागिरी | सदस्य |

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीबाबत प्रस्तावित केले.

सागरी किनारा असलेल्या प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनिटरींग समिती स्थापन करण्याबाबत पर्यावरण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एमसीझेडएमए 2011/सीआर-6/एमसीझेडएमए दिनांक 23/03/2011 ने कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनिटरींग समिती गठीत करण्यात आली आहे.

सदस्य सचिव यांनी सदर जिल्हा स्तरीय समितीला प्रदान केलेल्या अधिकारानुसार कोणकोणते कामकाज करावयाचे आहे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सदर समितीने खालील प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

1. अनधिकृत बांधकामे होऊ न देणे तसेच
2. सागरी पर्यावरणाच्या बाबत सुरक्षा व चांगल्या त-हेच्या धारणांच्या बाबतीत तसेच प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे.

3. नागरीकांच्या तक्रारीची दखल घेऊन कार्यवाही करणे.

सीआरझेड I, II, III मधील नियमांचे उल्लंघन करुन अतिक्रमणे केली असल्यास अशी अतिक्रमणे शोधून काढणेची आहेत. सभेमध्ये पुढील विषयावर चर्चा करणेत आली.

**1. सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत** - (Regarding illegal construction in CRZ area)

i) मा. संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक 30/05/2022 रोजीचे पत्रान्वये सीआरझेड क्षेत्रामध्ये करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामाबतची माहिती मागविलेली आहे. त्या अनुषंगाने दिनांक 18/07/2022 रोजीचे बैठकीपर्यंत उपविभाग निहाय खालीलप्रमाणे माहिती या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

| उपविभाग | CRZ I | CRZ II | CRZ III | एकुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| दापोली | 4 | 0 | 192 | 196 | - |
| खेड | 0 | 0 | 0 | 0 | - |
| चिपळूण | 0 | 0 | 203 | 203 | गुहागर नगर पंचायत क्षेत्र व ग्रामीण क्षेत्र मिळून एकत्रीत माहिती आहे. |
| रत्नागिरी | 0 | 0 | 145 | 145 | - |
| राजापूर | 0 | 0 | 499 | 499 | - |
| | **4** | **0** | **1039** | **1043** | |

ग्रामीण भागातील सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत वर नमुद केलेप्रमाणे सादर केलेल्या अहवालाची पुनश्च पडताळणी करुन यादी अंतिम करुन दिनांक 30/07/2022 पुर्वी अहवाल सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना दिनांक 18/07/2022 रोजीच्या जिल्हा स्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये शेवटची संधी देण्यात येत असलेबाबतच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

त्यानुसार सर्व उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत अंतिम सूधारित यादीसह अहवाल प्राप्त झाला असून तो पुढीलप्रमाणे आहे -

| उपविभाग | CRZ I | CRZ II | CRZ III | एकुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| दापोली | 0 | 0 | 196 | 196 | - |
| खेड | 0 | 11 | 0 | 11 | - |
| चिपळूण | 0 | 0 | 177 | 177 | गुहागर नगर पंचायत क्षेत्र व ग्रामीण क्षेत्र मिळून एकत्रीत माहिती आहे. |
| रत्नागिरी | 0 | 0 | 145 | 145 | - |
| राजापूर | 0 | 0 | 499 | 499 | - |
| | **0** | **11** | **1017** | **1028** | |

ii) नागरी भागातील माहितीपैकी गुहागर नगरपंचायत अंतर्गत 108 बांधकामे उपविभागीय अधिकारी चिपळुण यांचे अहवालामध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. तसेच मुख्याधिकारी, चिपळूण नगर परिषद यांनी चिपळूण नगर परिषद क्षेत्र सीआरझेड हद्दीत येत नसलेमुळे बांधकामाबाबतची निरंक

माहिती या कार्यालयास कळविली आहे. तसेच अन्य नगरपंचायत/ नगर परिषद यांची माहिती अदयापही अप्राप्त आहे. तसेच दिनांक 18/07/2022 रोजीचे बैठकीमध्ये 'जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन यांना माहिती सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले असून देखील जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन यांचेमार्फत माहिती प्राप्त झालेली नाही. सदर बाबत जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन यांनी 15 दिवसांत अहवाल सादर करणेची तजवीज ठेवणेत आलेबाबत अध्यक्ष यांना सांगितले.

iii) उपविभागीय अधिकारी यांचेकडून नव्याने प्राप्त झालेला अहवाल एकत्रित करुन अंतिम अहवाल तयार करण्यात येवुन मा. एमसीझेडएमए, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे यादीसह अहवाल सादर करावा असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

तसेच यापुढे सीआरझेड क्षेत्रामध्ये अनधिकृत/ विनापरवाना बांधकाम होणार नाही याकडे लक्ष पुरवावे असे निर्देश उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले.

## 2. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

या कार्यालयाकडे मा. एमसीझेडएमए, पर्यावरण विभाग, मुंबई तसेच नागरिकांकडून सीआरझेड क्षेत्रामध्ये विनापरवाना बांधकाम केलेबाबत तक्रारी प्राप्त होत असतात. उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. -

| उपविभाग | माहे डिसेंबर 2021 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2022 ते ऑगस्ट 22 अखेर प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 14 | 1 | 15 | 3 | **12** | 3 | 9 | 6 | 3 |
| खेड | 0 | 1 | 1 | 0 | **1** | 0 | 1 | 0 | 1 |
| चिपळूण | 8 | 0 | 8 | 3 | **5** | 1 | 4 | 2 | 2 |
| रत्नागिरी | 10 | 4 | 14 | 0 | **14** | 1 | 13 | 6 | 7 |
| राजापूर | 4 | 1 | 5 | 0 | **5** | 1 | 4 | 1 | 3 |
| | **36** | **7** | **43** | **6** | **37** | **6** | **31** | **15** | **16** |

| उपविभाग | MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या | अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या |
|---|---|---|---|
| दापोली | 2 | 7 | 9 |
| खेड | 0 | 1 | [illegible] |
| चिपळूण | 1 | 3 | 4 |
| रत्नागिरी | 2 | 11 | 13 |
| राजापूर | 1 | 3 | 4 |
| | **6** | **25** | **31** |

i) **उपविभाग दापोली -**

i) मौजे हर्णे, ता. दापोली येथील ब्ल्यू ब्रीज प्रोजेक्ट (सीआरझेड एस आर 39) चे संदर्भात नगर रचनाकार यांजकडे मोजणी नकाशे पाठविणेत आले आहेत. नगर रचनाकार यांचा अहवाल प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही करणेत येईल असे उपविभागीय अधिकारी, दापोली यांनी सांगितले. सदर बाबत प्रतिनिधी नगररचना, रत्नागिरी यांना अहवाल सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले.

ii) मौजे तामसतिर्थ येथील समुद्राजवळील बांधकाम (सीआरझेड एस आर 50) प्रकरणी उप अधिक्षक, भूमी अभिलेख दापोली यांना नजर मोजणी नकाशा सादर करणेबाबत लेखी पत्र दिलेबाबत उपविभागीय अधिकारी, दापोली यांनी अध्यक्ष यांना सांगितले.

ii) **उपविभाग खेड -**

i) मौजे भरणेनाका, ता. खेड येथील विनापरवाना बांधकाम (सीआरझेड एस आर 53) चे संदर्भात नगर रचनाकार, उप अधिक्षक, भूमी अभिलेख व तहसीलदार खेड यांजकडून अहवाल मागविणेत आला आहे. तसेच संबंधितांकडून अहवाल प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही करणेत येईल असे उपविभागीय अधिकारी, खेड यांनी अध्यक्ष यांना सांगितले.

iii) **उपविभाग चिपळूण -**

i) मौजे गुहागर येथील खाते नं. 379 गुहागर येथील सीआरझेड I मधील जागेत वन खात्याने बांधलेल्या नाना नानी पार्क बाबत तक्रार प्रकरणी विभागीय वन अधिकारी रत्नागिरी (चिपळूण) यांनी अदयापही सदयस्थितीचा अहवाल सादर केलेला नाही. तरी सदर प्रकरणी तात्काळ अहवाल सादर करणेचे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

ii) मौजे गुहागर, येथील श्री. परचुरे यांनी केलेल्या तक्रार अर्जप्रकरणी उपविभागीय अधिकारी, चिपळूण यांनी आजच अहवाल ई-मेल द्वारे सादर केलेला असलेचे अध्यक्ष यांना सांगितले.

iv) **उपविभाग रत्नागिरी -**

i) मौजे मुसलमानवाडी ता. रत्नागिरी येथील (सीआरझेड एस आर 1) खाडीकिना-या लगतच्या जमिनीतील अतिक्रमण प्रकरणी निष्कासन आदेशाप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन अहवाल सादर करणेकामी तहसीलदार रत्नागिरी यांना लेखी कळविणेत आले असलेचे उपविभागीय अधिकारी, रत्नागिरी यांनी अध्यक्षांना सांगितले.

ii) मौजे काळबादेवी येथील (सीआरझेड एस आर 7) बांधकाम प्रकरणी नगर रचनाकार रत्नागिरी यांचे अहवालाप्रमाणे संडास सदृश्य बांधकाम सीआरझेड क्षेत्रामध्ये येत असून अन्य व्यक्तींची बांधकामे सीआरझेड क्षेत्राबाहेर आहेत असे उपविभागीय अधिकारी, रत्नागिरी यांनी अध्यक्षांना सांगितले.

iii) मौजे कर्ला येथील (सीआरझेड एस आर 49) बांधकाम प्रकरणी निष्कासनाचा आदेश पारित करण्यात आलेबाबत उपविभागीय अधिकारी, रत्नागिरी यांनी अध्यक्षांना सांगितले.

iv) मौजे झाडगांव म्यु.आंत येथील (सीआरझेड एस आर 52) खाडीतील बांधकाम प्रकरणी निष्कासनाचा आदेश पारित करण्यात आला आहे तसेच बांधकामधारक यांचेविरुध्द मा. मुख्य न्यायदंडाधिकारी रत्नागिरी यांचे न्यायालयात पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 कलम 15 नुसार फिर्याद दाखल करण्यात आली असलेबाबत उपविभागीय अधिकारी, रत्नागिरी यांनी अध्यक्षांना सांगितले.

v) भाटये व आरे-वारे येथील बांधकामाबाबत कारवाई करणेबाबत 3 ते 4 वेळा समक्ष सूचना दिल्या होत्या, तथापि त्यानुसार कोणतीही कार्यवाही केलेली नसलेबाबत दिनांक 18/07/2022 रोजीच्या बैठकीमध्ये उपविभागीय अधिकारी रत्नागिरी यांना सूचना देण्यात आल्या होत्या. सदर सूचनांप्रमाणे मौजे कोतवडे ता.जि. रत्नागिरी येथील आरे-वारे बीच रिसॉर्ट या नावाने वाणिज्य बांधकाम केलेमुळे बांधकामधारक श्री. मयेकर यांना पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 कलम 5 नुसार नोटीस बजाविण्यात आली आहे. तसेच कलम 15 नुसार फिर्याद दाखल करणेत आली असलेबाबत उपविभागीय अधिकारी रत्नागिरी यांनी अध्यक्ष यांना सांगितले.

v) **उपविभाग राजापूर -**

i) मौजे इंगळेवाडी ता. राजापूर येथील (सीआरझेड एस आर 48) उप अधिक्षक, भूमी अभिलेख राजापूर यांना मोजणी नकाशा सादर करणेबाबत लेखी कळविणेत आलेचे उपविभागीय अधिकारी, राजापूर यांनी अध्यक्षांना सांगितले.

ii) मौजे जैतापूर येथील (सीआरझेड एस आर 3 व 13) बांधकाम प्रकरणी स्थळपहाणी करण्यात आली असुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करणेत येईल असे उपविभागीय अधिकारी, राजापूर यांनी अध्यक्षांना सांगितले.

**प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना -**

1. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन अहवाल तात्काळ सादर करता येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.
2. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.
3. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये सुनावणी तारखेस उपस्थित रहावे, व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.
4. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

**<u>सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना -</u>**

1. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.
2. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
3. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.
4. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहा. संचालक नगर रचना यांचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका /नगरपालिका/नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.

5. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

6. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

7. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

तसेच पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनीच सभेस येणेचे आहे प्रतिनिधी पाठवू नयेत अशा सूचना देण्यात आल्या व सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या स्वाक्षरीची असे.**

क्र. महसूल/कार्या/अे.के. 6/DCZMA/08/2022
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - 29/09/2022

**(श्रीकांत गायकवाड)**
**सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती**
**रत्नागिरी तथा, निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी**

प्रतिलिपी - सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

महाराष्ट्र शासन

महसूल व वनविभाग

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत दुसरा मजला कक्ष क्र.२०१,महसूल शाखा जयस्तंभ ता.जि.रत्नागिरी

दुरध्वनी क्रमांक : ०२३५२-२२२४८३ फॅक्स क्रमांक : ०२३५२-२२६२५०

०२३५२-२२४२२२ Email ID:- revenuecollector@yahoo.in

क्र. क्र.महसूल/कार्या.अे.के.-6/DCZMA/08/2022 दिनांक : 30/08/2022

प्रति,

मा. अध्यक्ष
महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अॅथॉरिटी,
पर्यावरण विभाग, 15 वा मजला,
नविन प्रशासकीय भवन
मंत्रालय, मुंबई-400 003

**विषय : जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती (DCZMA) व टास्क फोर्स समिती सभेचे इतिवृत्त - माहे ऑगस्ट 2022**

महोदय,

जिल्हास्तरीय सागरी किनारा नियमन प्रक्षेत्र व्यवस्थापन समिती व टास्क फोर्स समितीची सभा **दिनांक 29/08/2022 रोजी दुपारी 04.00 वाजता** मा. जिल्हाधिकारी यांचे दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर समितीच्या सभेचे इतिवृत्त आपले माहितीस्तव यासोबत सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

**(श्रीकांत गायकवाड)**
सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती,
रत्नागिरी तथा निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी

# दिनांक 29/08/2022 रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | प्रतिनिधी जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| 4. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| 5. | प्रतिनिधी विभागीय वन अधिकारी (चिपळूण), रत्नागिरी | सदस्य |
| 6. | सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| 7. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| 8. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| 9. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| 10. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 11. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| 12. | प्रतिनिधी उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| 13. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |
| 14. | प्रतिनिधी सहा. आयुक्त, मत्स्य व्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| 15. | मुख्याधिकारी, नगर परिषद रत्नागिरी | सदस्य |
| 16. | मुख्याधिकारी, नगर परिषद खेड | सदस्य |
| 17. | प्रभारी, मुख्याधिकारी, नगर परिषद गुहागर | सदस्य |
| 18. | डॉ. ए.सी.ठाकूरदेसाई, प्राचार्य, गोगटे जोगळेकर कॉलेज रत्नागिरी | सदस्य |
| 19. | श्री. ए.डी.जाधव, प्राध्यापक, डी.बी.जे. महाविदयालय चिपळूण | सदस्य |

तसेच वरील समिती सदस्यां व्यतिरीक्त अन्य संबंधित विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांना बैठकीस उपस्थित रहाणेबाबत कळविणेत आलेमुळे खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी प्रत्यक्ष बैठकीस उपस्थित राहिलेले आहेत.

1. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी
2. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लिमि. रत्नागिरी
3. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण रत्नागिरी
4. प्रतिनिधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम चिपळूण
5. प्रतिनिधी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम (विदयुत) विभाग रत्नागिरी
6. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद रत्नागिरी
7. तहसीलदार दापोली

8. जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन रत्नागिरी
9. गटविकास अधिकारी, पंचायत समिती दापोली
10. मुख्याधिकारी नगरपरिषद दापोली

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करून अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

त्याअनुषंगाने विचारविनिमय/चर्चा करणेसाठी मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 29/08/2022 रोजी तात्काळ बैठक आयोजित करण्यात आली असलेचे सर्व उपस्थित अधिकारी/कर्मचारी यांना सांगण्यात आले.

सभेमध्ये पुढील विषयावर चर्चा करणेत आली.

**1. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत -**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीच्या निर्देशाचे वाचन करण्यात आले.

i) सदर निर्देशांमध्ये परिच्छेद क्र. 6 मध्ये तज्ञ समितीचे निष्कर्ष आणि शिफारशी नमुद करण्यात आलेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे आहेत -

1) मौजे मुरुड, ता. दापोली येथील सागरी किनारी स.नं. 446 मध्ये बांधण्यात आलेली अनधिकृत बांधकामे निष्कासीत करुन/पुर्णपणे हटवून सदरची जागा पुर्वस्थापित करावी.

2) निष्कासन करतेवेळी निर्माण होणारी संभाव्य मोडतोड आणि इतर सामग्री योग्यरित्या गोळा करणे आवश्यक आहे आणि एकतर पुनर्प्रक्रिया / पुर्नवापरासाठी किंवा विल्हेवाट लावण्यासाठी स्थानिक सक्षम प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीने सुरक्षितपणे वाहतूक करणे आवश्यक आहे. सदरची प्रक्रिया पार पाडत असताना, Construction and Demolition Waste Management Rules, 2016 च्या लागू असलेल्या तरतुदींचे सुनिश्चित पालन करावयाचे आहे. सदर निष्कासन करतेवेळी

आवश्यक असल्यास तज्ञांचे मत घ्यावे आणि सक्षम प्राधिकारी किंवा तज्ञ संस्था यांचे मार्गदर्शनाखाली निष्कासनाची कार्यवाही पुर्ण करावी.

3) निष्कासनाची कार्यवाही झालेनंतर वृक्षलागवड किंवा आसपासच्या वातावरणाशी सुसंगत क्षेत्र विकसित करणे आवश्यक राहिल.

4) तज्ञ समितीने CRZ अधिसूचना 2011 चे उल्लंघन केल्याबद्दल रक्कम रु. 37,91,250/- व 25,27,500/- अनुक्रमे सी कौंच रिसॉर्ट व साई रिसॉर्ट एनएक्स साठी पर्यावरणीय नुकसान भरपाई म्हणून शिफारस केली आहे.

5) बांधकाम निष्कासन, वाहतूक आणि विल्हेवाट लावणे यासह क्षेत्र पुनर्संचयित करणे / आसपासच्या वातावरणाच्या अनुषंगाने क्षेत्र विकसित करणे यावर होणा-या खर्चाची गणना सक्षम व तज्ञ प्राधिकारी यांच्या माध्यमातुन स्वतंत्रपणे करण्यात यावी.

ii) संयुक्त तज्ञ समितीचे निष्कर्ष व शिफारशी लक्षात घेता, पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत मा. MOEF&CC, नवी दिल्ली यांचेमार्फत निर्णय घेण्यात आला असुन सदर निर्देशांमधील परिच्छेद क्र. 8 मध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे -

संयुक्त समितीने गणना केलेली पर्यावरणीय भरपाईची रक्कम CPCB चे गणनेप्रमाणे सुधारित करावी, असे निर्देश आहेत.

मा. MOEF&CC, नवी दिल्ली यांजकडील दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देशांचे अनुषंगाने कार्यवाही पुर्णतः पार पाडण्यासाठी सक्षम प्राधिकारी किंवा तज्ञ समिती यांची नेमणूक मा. एमसीझेडएमए, मुंबई यांचेमार्फत करुन मिळणेबाबत तसेच बांधकाम निष्कासन, वाहतूक आणि विल्हेवाट लावणे यासह क्षेत्र पुनर्संचयित करणे / आसपासच्या वातावरणाच्या अनुषंगाने क्षेत्र विकसित करणे यावर होणारा खर्च कोणामार्फत करणेचा आहे याबाबत उक्त निर्देशामध्ये स्पष्टपणे नमुद केलेले आढळून येत नसलेमुळे त्याबाबत मा. एमसीझेडएमए, मुंबई यांचेमार्फत तरतूद होणेबाबत, सविस्तर मार्गदर्शन मिळणेबाबत मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडे या कार्यालयाकडील दिनांक 25/08/2022 रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर करण्यात आला होता.

सदर अहवालाचे अनुषंगाने मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक 26/08/2022 रोजीचे पत्रान्वये “जिल्हाधिकारी कार्यालयाकडील दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रामध्ये नमूद केलेल्या कायदेशीर समस्यांसह सर्व समस्या DCZMC-जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती द्वारे रीतसर आणि योग्यरित्या हाताळल्या जाव्यात तसेच मा. MOEF&CC, नवी दिल्ली यांजकडील दिनांक 22/08/2022 रोजीच्या आदेशाच्या अंमलबजावणीचा खर्च मा. एमसीझेडएमए, मुंबई द्वारे केला जाईल अशा सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

तसेच मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकामाबाबत श्री.सदानंद गंगाराम कदम यांनी मा.दिवाणी न्यायालय व. स्तर खेड येथे रे. दि. मु नंबर 57/2021 अन्वये दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याचे कामकाज आज मा. दिवाणी न्यायालय खेड येथे न्यायप्रविष्ट असून मा. दिवाणी न्यायालय व. स्तर खेड यांचेकडील दिनांक 19/07/2021 रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुत

दाव्यामध्ये जैसे-थे चे आदेश पारित करण्यात आलेले आहेत. सदर दाव्यामध्ये दिनांक- 30/09/2022 रोजी पुढील सुनावणी निश्चित करण्यात आलेली आहे.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 मधील बांधकामांबाबत वरीलप्रमाणे वस्तुस्थिती उपस्थित अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देणेत आली. तद्नंतर उक्त विषयी विचारविनिमय व सविस्तर चर्चा करणेत आलेनंतर पुढीलप्रमाणे समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले -

a) मा. MOEF&CC, नवी दिल्ली यांजकडील दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देशांमधील परिच्छेद क्रमांक 8 मध्ये नमुद केलेप्रमाणे संयुक्त समितीने गणना केलेली पर्यावरणीय भरपाईची रक्कम CPCB चे गणनेप्रमाणे सुधारित करावी असे निर्देश आहेत. त्यामुळे पर्यावरणीय भरपाईची रक्कम CPCB चे गणनेप्रमाणे सुधारित करणेबाबत प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी CPCB व संयुक्त समितीशी समन्वय साधून योग्य ती कार्यवाही करावी असे निर्देश अध्यक्ष यांनी उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळूण यांना दिले.
b) मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 मधील अस्तित्वात असलेली बांधकामे मे. साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांना रिसॉर्टचा वापर बंद करणेबाबत व विदयुत व पाणी पुरवठा खंडीत करणेबाबत त्वरित नोटिस दयावी असे निर्देश अध्यक्ष यांनी उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळूण यांना दिले.
c) मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 मधील बांधकामे निष्कासन करतेवेळी निर्माण होणारी संभाव्य मोडतोड आणि इतर सामग्री योग्यरित्या गोळा करून विल्हेवाट लावण्यासाठी सुयोग्य, सीआरझेड क्षेत्राचे बाहेर असलेली व पर्यावरण पुरक जागा ज्या ठिकाणी कोणतेही प्रदुषण होणार नाही अशा जागेची निवड गटविकास अधिकारी, पंचायत समिती दापोली, तहसीलदार दापोली व उपविभागीय अधिकारी दापोली यांनी संयुक्त रित्या करावी. सुयोग्य जागा अंतिम केल्यानंतर सदर जागेचा तपशिल जसे की, 7/12, उक्त मिळकतीपासुन ते मलबा टाकणेसाठी अंतिम केलेल्या जागेचे अंतर, जागा खाजगी असल्यास जमीन मालकाची संमती, प्रदुषण दृष्टया जागा सुयोग्य असून निसर्गास प्रदुषणदृष्टया कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही याबाबत उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळुण यांचे ना-हरकत प्रमाणपत्रासह अहवाल या कार्यालयास तसेच अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी यांजकडे सादर करावा, असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.
d) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी यांनी बांधकाम निष्कासन (प्रत्यक्ष बांधकाम रचना, विदयुत व पाणी इ.सह) मलबा वाहतूक करणे आणि विल्हेवाट लावणे यासह क्षेत्र पुनर्संचयित करणे / आसपासच्या वातावरणाच्या अनुषंगाने क्षेत्र विकसित करणेकामी जागा सपाटीकरण करणे यावर होणारा खर्च याची गणना करून अंदाजपत्रक सादर करावे, असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले. त्यावर अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी यांनी बांधकामाचा नकाशा उपलब्ध करून दिल्यास खर्चाची गणना करणे सुलभ होणार असलेबाबत समितीस सांगितले. त्यावर उपविभागीय अधिकारी दापोली यांनी उक्त बांधकामे ही अनधिकृत व विनापरवाना असलेमुळे नकाशा उपलब्ध होऊ शकत नाही असे सांगितले. त्यावर बांधकामाचे ठिकाणी प्रत्यक्ष स्थळपहाणी करून उक्त खर्चाची गणना करून अंदाजपत्रक तयार करावे, असे निर्देश अध्यक्ष यांनी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी यांना दिले.

e) बांधकाम निष्कासन, मलबा वाहतूक आणि विल्हेवाट लावणे यासह क्षेत्र पुनर्संचयित करणे/ आसपासच्या वातावरणाच्या अनुषंगाने क्षेत्र विकसित करणे या प्रत्येक कामी उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी निसर्गास प्रदुषणदृष्टया कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही व निसर्गाचा समतोल राखता यावी यासाठी तात्काळ समिती गठीत करावी. तसेच सदर समितीमध्ये एमसीझेडएमए समितीमधील तज्ञ सदस्य/प्रतिनिधी यांची नेमणुक करावी असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले. त्यावर उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी सदर समितीची स्थापना प्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांचे परवानगीने करणेत येईल असे समितीस सांगितले. यावर अध्यक्ष यांनी दिनांक 30/08/2022 पर्यंत समिती गठीत करावी. सदर समितीमध्ये मा. MCZMA च्या प्रतिनिधींची नियुक्ती करावी व तसे या कार्यालयास कळवावे असे निर्देश उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना दिले. तसेच बांधकाम निष्कासन, मलबा वाहतूक आणि विल्हेवाट लावणे यासह क्षेत्र पुनर्संचयित करणे/ आसपासच्या वातावरणाच्या अनुषंगाने क्षेत्र विकसित करणे या प्रत्येक कामी निसर्गास प्रदुषणदृष्टया (पाणी, हवा इ.) कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही व निसर्गाचा समतोल राखुन संपूर्ण प्रक्रिया पार पाडणेसाठी Construction and Demolition Waste Management Rules, 2016 च्या लागू असलेल्या तरतुदींचे अनुषंगाने मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करावीत, असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

f) बांधकाम निष्कासन करताना तयार होणारा मलबा रीतसर व योग्यरित्या वाहतूक करुन नियोजीत ठिकाणी विल्हेवाटीसाठी ठेवणेकामी वाहतूकीची पध्दत (Methodology) प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सहकार्याने व त्यांचेकडील मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी यांनी निश्चीत करावी, असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

g) निष्कासनाची कार्यवाही झालेनंतर सदर जागी तसेच मलबा ज्या ठिकाणी विल्हेवाटीसाठी टाकणेत येणार आहे त्या ठिकाणी वृक्षलागवड किंवा आसपासच्या वातावरणाशी सुसंगत क्षेत्र विकसित करणेसाठी, सदर दोन्ही ठिकाणी वृक्षलागवड करणे, त्यांची 5 वर्षापर्यंत निगा/देखभाल राखणे व झाडांचे संरक्षण करणे यासाठी येणा-या खर्चाची गणना (बी-बियाणे/रोपे खरेदी, झाडांना पाणी देणे किंवा अन्य देखभालीचे अनुषंगाने आवश्यक गोष्टी यासह) करुन अंदाजपत्रक या कार्यालयास सादर करणेचे निर्देश अध्यक्ष यांनी विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, रत्नागिरी यांना दिले.

h) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी व विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, रत्नागिरी यांनी खर्चाची गणना करुन अंदाजपत्रक सादर केलेनंतर, नियोजीत खर्चासाठी निधी मंजुरीसाठी प्रस्ताव मा. संचालक तथा सदस्य सचिव, पर्यावरण विभाग, मुंबई यांचेकडे सादर करणेत येईल, असे अध्यक्ष यांनी सांगितले.

i) मा. संचालक तथा सदस्य सचिव, पर्यावरण विभाग, मुंबई यांचेमार्फत खर्चासाठी मंजुरी व मान्यता प्राप्त झालेनंतर अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी यांनी कमी कालावधीची निविदा काढुन पुढील प्रक्रिया लवकरात लवकर पार पाडावी असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले. दरम्यानच्या काळात निविदा प्रक्रिया पूर्ण करुन घ्यावी.

j) हलविता येण्यासारखी विदयुत उपकरणे (उदा. ए.सी., फॅन, वॉटर प्युरिफायर, कुलर इ.) किंवा विदयुतीकरणाच्या निरुपयोगी वस्तु/गोष्टी यांच्या रक्कमेची गणना केलेनंतर सदर गोष्टी काही कालावधीनंतर तिथे उपलब्ध नसल्यास काय करावे असे प्रतिनिधी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम

(विदयुत) विभाग रत्नागिरी यांनी समितीस विचारलेनंतर, गणना करतेवेळी फोटो काढुन खर्चाची गणना करावी अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

k) निष्कासन करतेवेळी तोडफोडीमधून प्राप्त झालेले स्टिल गोळा करुन त्याचा लिलाव करावा (E-Auction) असे जिल्हा सह आयुक्त, नगर पालिका प्रशासन यांनी समितीस सूचविले त्यावर अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी यांनी निविदेमधुन सदर रक्कम कमी करणे योग्य होईल, असे समितीस सुचित केले. जेणेकरुन वापरण्यायोग्य गोष्टी गोळा करणे, त्याची साठवण व संरक्षण करणे हया बाबी कमी होतील. सदर सुचना समितीने सर्वानुमते मान्य केली.

l) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लि. रत्नागिरी यांनी विज पुरवठा खंडीत करणेसाठी आदेश/पत्र आवश्यक असलेबाबत समितीस सांगितले. यावर उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी मा. MOEF&CC, नवी दिल्ली यांचे दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देशानुसार विज पुरवठा खंडीत करणेसाठी महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लि. यांना पत्र देणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

m) प्रत्यक्ष बांधकाम निष्कासनाचेवेळी फायर फायटर सुविधा मुख्याधिकारी, नगर पंचायत दापोली यांनी उपलब्ध ठेवावी असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

n) प्रत्यक्ष बांधकाम निष्कासनाचे अगोदर 5 दिवस आधी पोलीस विभागास कळविणेत यावे जेणेकरुन पुरेसा पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देणे शक्य होईल. सदर बाब समितीने सर्वानुमते मान्य केली.

o) बांधकाम निष्कासन, मलबा वाहतूक आणि विल्हेवाट लावणे यासह क्षेत्र पुनर्संचयित करणे/ आसपासच्या वातावरणाच्या अनुषंगाने क्षेत्र विकसित करणे यासाठी खर्चाची गणना करुन अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी यांनी 10 दिवसांत अंदाज पत्रक सादर करावे. तसेच मलबा ठेवणेसाठी सुयोग्य जागेची निवड करुन जागेचा तपशिल अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी व या कार्यालयाकडे गटविकास अधिकारी, पंचायत समिती व तहसीलदार दापोली यांनी 8 दिवसात सादर करावा. तसेच निष्कासनाची कार्यवाही झालेनंतर सदर जागी तसेच मलबा ज्या ठिकाणी विल्हेवाटीसाठी टाकणेत येणार आहे त्या ठिकाणी वृक्षलागवड किंवा आसपासच्या वातावरणाशी सुसंगत क्षेत्र विकसित करणेसाठी, सदर दोन्ही ठिकाणी वृक्षलागवड करणे, त्यांची 5 वर्षापर्यंत निगा/देखभाल राखणे व झाडांचे संरक्षण करणे यासाठी येणा-या खर्चाची गणना (बी-बियाणे/रोपे खरेदी, झाडांना पाणी देणे किंवा अन्य देखभालीचे अनुषंगाने आवश्यक गोष्टी यासह) करुन विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, रत्नागिरी यांनी 7 दिवसात अंदाजपत्रक सादर करावे, असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले. त्यास सर्व संबंधित विभाग/यंत्रणा व समितीमध्ये सर्वानुमते मान्य करणेत आले.

p) मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 चे बाबतीत कायदेशीर बाबी सुनावणीवर प्रलंबित आहेत. मा. दिवाणी न्यायाधीश, खेड यांचे न्यायालयात प्रलंबित असलेल्या दावा क्र. 57/2021 मध्ये मा. न्यायालयाने जैसे-थे चा आदेश पारित केलेला आहे. तरी उपविभागीय अधिकारी दापोली यांनी मा. MOEF&CC, नवी दिल्ली यांजकडील दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश तात्काळ मा. न्यायालयाचे निदर्शनास आणून देवुन जैसे-थे चा पारित केलेला आदेश रद्दबातल करुन घेणेबाबत योग्य ती कायदेशीर प्रक्रिया जिल्हा सरकारी वकील यांचेमार्फत करावी. असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले. यावर उपविभागीय अधिकारी दापोली यांनी मा. न्यायालयात समक्ष जावुन जिल्हा

सरकारी वकील व मा. दिवाणी न्यायाधीश, खेड यांचेशी चर्चा करुन कायदेशीर प्रक्रियेद्वारे योग्य ती कार्यवाही करणेत येईल असे समितीस सांगितले.

दरम्यानचे काळात विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे कायदेशीर बाबींबाबत मार्गदर्शन मागविणे योग्य राहील असे जिल्हा विधी अधिकारी, रत्नागिरी यांनी सूचित केले. त्यानुसार विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे कायदेशीर बाबींबाबत मार्गदर्शन मागविणेबाबत अहवाल सादर करणेत यावा असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

q) मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 मधील दोन अनधिकृत बांधकामाचे मा. MOEF&CC, नवी दिल्ली यांचे निर्देशानुसार निष्कासन करणेसाठी आज रोजी विविध विभागांना दिलेल्या सुचनांनुसार सुयोग्यरित्या व पर्यावरण पुरक पध्दतीने कार्यवाही पूर्ण करुन घेणे याकरीता समन्वय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी, दापोली यांनी काम पहाणेचे आहे, असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नाही. सदरची कार्यवाही मा. MOEF&CC, नवी दिल्ली यांजकडील दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देशानुसार पुर्ण करावयाची असलेमुळे संबंधित सर्व विभाग/यंत्रणा यांनी त्यांना सभेमध्ये देणेत आलेल्या सूचनांनुसार कार्यवाही विहित मुदतीत व सर्व नियमांचे पालन करुन करावी, असे निर्देश देण्यात आले.

उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झालेचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या स्वाक्षरीची असे.**

क्र. महसूल/कार्या/अे.के. 6/DCZMA/08/2022
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - 30/08/2022

**(श्रीकांत गायकवाड)**
**सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती**
**रत्नागिरी तथा, निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी**

प्रतिलिपी - सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

**दिनांक 26/09/2022 रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | प्रतिनिधी जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| 4. | प्रतिनिधी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| 5. | प्रतिनिधी विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 6. | प्रतिनिधी सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| 7. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| 8. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| 9. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| 10. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 11. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| 12. | प्रतिनिधी उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| 13. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |
| 14. | प्रतिनिधी मुख्याधिकारी, नगर परिषद रत्नागिरी | सदस्य |
| 15. | प्रतिनिधी मुख्याधिकारी, नगर परिषद खेड | सदस्य |
| 16. | प्रतिनिधी मुख्याधिकारी, नगर पंचायत गुहागर | सदस्य |

तसेच वरील समिती सदस्यां व्यतिरीक्त अन्य संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना बैठकीस उपस्थित रहाणेबाबत कळविणेत आलेमुळे खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी हे प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे बैठकीस उपस्थित राहिलेले आहेत.

1. प्रतिनिधी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लिमि. रत्नागिरी
2. प्रतिनिधी विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण रत्नागिरी
3. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम चिपळूण
4. उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम (विदयुत) विभाग रत्नागिरी
5. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद रत्नागिरी
6. तहसीलदार दापोली
7. गटविकास अधिकारी, पंचायत समिती दापोली

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत. त्याअनुषंगाने दिनांक 29/08/2022 रोजी आयोजित बैठकीच्या इतिवृताचे वाचन करण्यात आले. सदर इतिवृतामध्ये दिलेल्या निर्देशांचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित विभाग/यंत्रणा यांनी समितीस अवगत करावे अशी विनंती सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केली.

**1. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट-साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट व रस्त्याचे केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत -**

**a) <u>समिती गठन - विभाग प्रदुषण नियंत्रण मंडळ</u>**

बांधकाम निष्कासन, मलबा वाहतूक आणि विल्हेवाट लावणे यासह क्षेत्र पुनर्संचयित करणे/ आसपासच्या वातावरणाच्या अनुषंगाने क्षेत्र विकसित करणे या प्रत्येक कामी निसर्गास प्रदुषणदृष्टया कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही व निसर्गाचा समतोल राखता यावी यासाठी उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी तात्काळ समिती गठीत करणेबाबतचे निर्देश दिनांक 29/08/2022 रोजीच्या बैठकीमध्ये देण्यात आले होते. त्यावर उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी समिती गठन झालेबाबत समितीस सांगितले. त्यावर अध्यक्ष यांनी समिती गठीत झालेबाबतचा आदेश या कार्यालयाकडे सादर करावा तसेच वाहतूकीची पध्दत (Methodology) व मागदर्शक तत्वे यांची निश्चिती करुन बांधकाम विभाग व या कार्यालयास सादर करावी अशा सूचना उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना अध्यक्ष यांनी दिल्या.

**b) <u>सीआरझेड क्षेत्राचे बाहेर असलेली व पर्यावरण पुरक जागेची निश्चिती करणे - गटविकास अधिकारी दापोली व तहसीलदर दापोली</u>**

प्रदुषण दृष्टया सुयोग्य जागा व निसर्गास प्रदुषणदृष्टया कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही तसेच सीआरझेड क्षेत्राचे बाहेर असलेली व पर्यावरण पुरक जागा अंतिम केलेनंतर, उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळुण यांचे ना-हरकत प्रमाणपत्रासह अहवाल सादर करणेबाबतचे निर्देश गटविकास अधिकारी दापोली व तहसीलदर दापोली यांना दिनांक 29/08/2022 रोजीच्या बैठकीमध्ये देण्यात आले होते. त्यानुषंगाने Construction and Demolition Waste Management Rules, 2016 मध्ये नमुद तरतुदींनुसार ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा Form-1 साठी तहसीलदार कार्यालयामार्फत नोंदणी (Registration) करण्यात आलेली असलेबाबत तहसीलदार दापोली यांनी सांगितले. तसेच सदरची नोंदणी करताना आवश्यक असलेली माहिती तांत्रिक स्वरुपाची असुन बांधकाम खात्याशी संबंधित असलेमुळे उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, दापोली यांनी सदरची माहिती पुरविणे आवश्यक

असलेचे तहसीलदार दापोली यांनी सांगितले. त्यावर अध्यक्ष यांनी उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळुण व सार्वजनिक बांधकाम विभाग दापोली यांचेशी व्ही.सी. द्वारे बैठक आयोजित करुन तांत्रिक बाबी पुर्ण करुन घ्याव्यात. याकामी प्रदुषण नियंत्रण मंडळाने संगणकीय तसेच तांत्रिक बाबींमध्ये सर्वतोपरी सहकार्य करुन ना-हरकत दाखला देणेबाबत कार्यवाही करणेच्या सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

c) <u>सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर करावयाच्या अंदाजपत्रकाबाबत -</u>

अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी यांनी बांधकाम निष्कासन (प्रत्यक्ष बांधकाम रचना, विदयुत व पाणी इ.सह) मलबा वाहतूक करणे आणि विल्हेवाट लावणे यासह क्षेत्र पुनर्संचयित करणे / आसपासच्या वातावरणाच्या अनुषंगाने क्षेत्र विकसित करणेकामी जागा सपाटीकरण करणे यावर होणारा खर्च याची गणना करुन अंदाजपत्रक सादर करावे, असे निर्देश दिनांक 29/08/2022 रोजीच्या बैठकीमध्ये अध्यक्ष यांनी दिले होते. तथापि कार्यकारी अभियंता, चिपळूण, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांनी बांधकाम निष्कासन करणेच्या कार्यवाहीसाठी सल्लागार नियुक्तीचे दरपत्रक दिनांक 22/09/2022 रोजीचे पत्रान्वये या कार्यालयास सादर केले आहे.

तरी दिनांक 22/09/2022 रोजीच्या पत्रान्वये प्राप्त दरपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागास परत पाठविणेत यावे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 मधील बांधकाम (प्रत्यक्ष बांधकाम रचना, विदयुत व पाणी इ.सह) निष्कासन करणे, तयार होणारा मलबा वाहतूक करणे आणि विल्हेवाट लावणे यासह क्षेत्र पुनर्संचयित करणे / आसपासच्या वातावरणाच्या अनुषंगाने क्षेत्र विकसित करणेकामी जागा सपाटीकरण करणे यावर होणारा खर्च याची गणना करुन एकत्रित व पुर्ण कार्यवाही पार पाडणेसाठी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक स्वत: तयार करुन या कार्यालयास सादर करणेचे पुनश्च निर्देश अध्यक्ष यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास दिले.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधकाम निष्कासन करणे, तयार होणारा मलबा रीतसर व योग्यरित्या वाहतूक करुन नियोजीत ठिकाणी विल्हेवाटीसाठी ठेवणेकामी प्रदुषण नियंत्रण मंडळाने विहीत केलेली वाहतूकीची पध्दत (Methodology) व मागदर्शक तत्वांना अनुसरुन करणेची आहे. त्यासाठी बाहेरील सल्लागार यांची नियुक्ती न करता प्रदुषण नियंत्रण मंडळाने गठीत केलेल्या समितीमधील तज्ञ सदस्य (Expert Member) यांचे मागदर्शनाखाली व त्यांचे सल्ल्याने करावी असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

d) <u>सामाजिक वनीकरण विभागाने सादर करावयाच्या अंदाजपत्रकाबाबत -</u>

निष्कासनाची कार्यवाही झालेनंतर सदर जागी तसेच मलबा ज्या ठिकाणी विल्हेवाटीसाठी टाकणेत येणार आहे त्या ठिकाणी वृक्षलागवड किंवा आसपासच्या वातावरणाशी सुसंगत क्षेत्र विकसित करणेसाठी, सदर दोन्ही ठिकाणी वृक्षलागवड करणे, त्यांची 5 वर्षापर्यंत निगा/देखभाल राखणे व झाडांचे संरक्षण करणे यासाठी येणा-या खर्चाची गणना (बी-बियाणे/रोपे खरेदी, झाडांना पाणी देणे किंवा अन्य देखभालीचे अनुषंगाने आवश्यक गोष्टी यासह) करुन अंदाजपत्रक या कार्यालयास सादर करावे असे निर्देश दिनांक 29/08/2022 रोजीच्या बैठकीमध्ये अध्यक्ष यांनी सामाजिक वनीकरण विभागास देण्यात आले होते.

त्याअनुषंगाने प्रतिनिधी, सामाजिक वनीकरण विभाग यांनी समितीस असे सांगितले की, वृक्षलागवड झालेनंतर त्यांची 5 वर्षापर्यंत निगा/देखभाल राखणे व झाडांचे संरक्षण करणे (झाडांना पाणी देणे किंवा

अन्य देखभालीचे अनुषंगाने आवश्यक गोष्टी यासह) यासाठी मजुराची नियुक्ती करणे आवश्यक आहे. तथापि वृक्षलागवड करणेचे क्षेत्र हे 10 हेक्टर पेक्षा कमी असलेमुळे मजुराच्या कामकाजाच्या दिवसांमध्ये कपात होणार आहे. त्यामुळे झाडांची निगा/देखभाल राखणे व झाडांचे संरक्षण करणे कठीण होणारे आहे. त्यावर उक्त प्रकरण हे विशेष बाब गृहीत धरुन कुंपण वगैरे सारख्या उपाययोजना करता येवु शकत असतील तर त्याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये योग्य ती खर्चाची तरतूद करणेत येवुन अंदाजपत्रक या कार्यालयाकडे सादर करावे, अशा सूचना अध्यक्ष यांनी सामाजिक वनीकरण विभागास दिल्या.

**e) सार्वजनिक बांधकाम (विदयुत) विभागाने सादर करावयाच्या अंदाजपत्रकाबाबत -**

विदयुत उपकरणांच्या मुल्यांकनाची गणना करुन अंदाजपत्रक सादर करावे, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम (विदयुत) विभाग रत्नागिरी यांना दिनांक 29/08/2022 रोजीच्या बैठकीमध्ये अध्यक्ष यांनी दिले होते. त्यावर विदयुत उपकरणांचे विघटन आणि मूल्यांकन तयार करण्यात आले असुन त्याचा अहवाल सार्वजनिक बांधकाम, विभाग रत्नागिरी यांना सादर करणेत येणार आहे असे प्रतिनिधी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम (विदयुत) विभाग रत्नागिरी यांनी समितीस सांगितले.

**f) न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही -**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामाबाबत कारवाईचे अनुषंगाने दाखल दाव्यांमध्ये कायदेशीर बाबींचे दृष्टीने आवश्यक ते न्यायालयीन कामकाज उपविभागीय अधिकारी दापोली, उपविभाग दापोली यांनी पहावयाचे आहे, अशा सूचना सदस्य सचिव यांनी दिल्या.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नाही.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेले बांधकाम निष्कासनाचे दृष्टीने पुढीलप्रमाणे सर्वसाधारण सूचना देण्यात आल्या -

- बांधकाम निष्कासनाची कार्यवाही मा. MOEF&CC, नवी दिल्ली यांजकडील दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देशानुसार पुर्ण करावयाची असलेमुळे संबंधित सर्व विभाग/यंत्रणा यांनी त्यांना सभेमध्ये देणेत आलेल्या सूचनांनुसार कार्यवाही विहित मुदतीत करावी.

- बांधकाम निष्कासनाच्या प्रक्रियेमध्ये निसर्गास प्रदुषणदृष्टया (पाणी, हवा इ.) कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही व निसर्गाचा समतोल राखुन संपूर्ण प्रक्रिया पर्यावरण पुरक पध्दतीने (Eco-Friendly) पार पाडणेसाठी प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत गठीत केलेल्या समितीमधील तज्ञ सदस्यांच्या (Expert Member) अधिपत्याखाली व मार्गदर्शन घेवुन पार पाडणेचे आहे.

## 2. मा. एमसीझेडएमए,मुंबई यांजकडे सादर करण्यात येणा-या प्रस्तावांबाबत -

सीआरझेड अधिसूचनेनुसार सागर तटीय क्षेत्रात अधिसूचित केल्या गेलेल्या कामांना महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी बंधनकारक आहे. सागर तटीय क्षेत्रामध्ये अधिसूचित केल्या गेलेल्या कामांना सीआझेड परवानगी मिळणेबाबतचे प्रस्ताव संबंधित उपविभागीय अधिकारी/मुख्याधिकारी यांचेमार्फत मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडे सादर करण्यात येतात. संबंधित उपविभागीय अधिकारी/मुख्याधिकारी यांजकडे प्राप्त प्रस्तावांपैकी किती प्रस्ताव मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडे सादर करण्यात आले? व किती पाठविणेचे शिल्लक आहेत? त्यापैकी किती प्रस्तावांना मंजुरी मिळाली व किती मंजुरीसाठी प्रलंबित आहेत, याबाबतचा तपशिल मागविणेसाठी विहित नमुना तयार करणेत यावा. तसेच संबंधित उपविभागीय अधिकारी/मुख्याधिकारी यांनी दरमहा विहित नमुन्यात अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा, असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

## 3. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

या कार्यालयाकडे मा. एमसीझेडएमए, पर्यावरण विभाग, मुंबई तसेच नागरिकांकडून सीआरझेड क्षेत्रामध्ये विनापरवाना बांधकाम केलेबाबत तक्रारी प्राप्त होत असतात. उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. -

| उपविभाग | माहे डिसेंबर 2021 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2022 ते ऑगस्ट 22 अखेर प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 14 | 1 | 15 | 3 | **12** | 3 | 9 | 6 | 3 |
| खेड | 0 | 1 | 1 | 0 | **1** | 0 | 1 | 0 | 1 |
| चिपळूण | 8 | 0 | 8 | 3 | **5** | 2 | 3 | 2 | 1 |
| रत्नागिरी | 10 | 4 | 14 | 0 | **14** | 2 | 12 | 5 | 7 |
| राजापूर | 4 | 1 | 5 | 0 | **5** | 1 | 4 | 1 | 3 |
| | **36** | **7** | **43** | **6** | **37** | **8** | **29** | **14** | **15** |

| **उपविभाग** | **MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **एकुण तक्रारींची संख्या** |
|---|---|---|---|
| दापोली | 2 | 7 | 9 |
| खेड | 0 | 1 | 1 |
| चिपळूण | 1 | 2 | 3 |
| रत्नागिरी | 2 | 10 | 12 |
| राजापूर | 1 | 3 | 4 |
| | **6** | **23** | **29** |

तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करून सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करून अनुपालन अहवाल तात्काळ सादर करता येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे निर्देश सदस्य सचिव यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिले.

**प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना -**

1. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करून सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करून अनुपालन अहवाल तात्काळ सादर करता येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.
2. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करून घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.
3. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.
4. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

**<u>सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना -</u>**

1. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करून त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.
2. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
3. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.
4. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहा. संचालक नगर रचना यांचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका /नगरपालिका/नगरपरिषद/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.
5. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
6. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
7. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झालेचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या स्वाक्षरीची असे.**

क्र. महसूल/कार्या/अे.के. 6/DCZMA/09/2022
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - 30/09/2022

**(श्रीकांत गायकवाड)**
**सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती**
**रत्नागिरी तथा, निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी**

प्रतिलिपी - सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

**दिनांक 17/10/2022 रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | प्रतिनिधी जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| 4. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| 5. | विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 6. | प्रतिनिधी सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| 7. | प्रतिनिधी सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| 8. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| 9. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| 10. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| 11. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 12. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| 13. | प्रतिनिधी उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| 14. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |
| 15. | प्रतिनिधी मुख्याधिकारी, नगर परिषद रत्नागिरी | सदस्य |
| 16. | मुख्याधिकारी, नगर पंचायत गुहागर/दापोली (अतिरिक्त) | सदस्य |
| 17. | मुख्याधिकारी, नगर पंचायत खेड (अतिरिक्त) | सदस्य |

तसेच वरील समिती सदस्यां व्यतिरीक्त अन्य संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना बैठकीस उपस्थित रहाणेबाबत कळविणेत आलेमुळे खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी हे प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे बैठकीस उपस्थित राहिलेले आहेत.

1. प्रतिनिधी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लिमि. रत्नागिरी
2. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण रत्नागिरी
3. प्रतिनिधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम चिपळूण
4. प्रतिनिधी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम (विदयुत) विभाग रत्नागिरी
5. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद रत्नागिरी
6. तहसीलदार दापोली
7. प्रतिनिधी जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन रत्नागिरी
8. गटविकास अधिकारी, पंचायत समिती दापोली

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत. त्याअनुषंगाने दिनांक 26/09/2022 रोजी आयोजित बैठकीच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले. सदर इतिवृत्तामध्ये दिलेल्या निर्देशांचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित विभाग/यंत्रणा यांनी समितीस अवगत करावे अशी विनंती सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केली.

**1. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट-साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट व रस्त्याचे केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत -**

a) <u>समिती गठन - विभाग प्रदुषण नियंत्रण मंडळ</u>

बांधकाम निष्कासन, मलबा वाहतूक आणि विल्हेवाट लावणे यासह क्षेत्र पुनर्संचयित करणे/ आसपासच्या वातावरणाच्या अनुषंगाने क्षेत्र विकसित करणे या प्रत्येक कामी निसर्गास प्रदुषणदृष्टया कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही व निसर्गाचा समतोल राखता यावी यासाठी उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी तात्काळ समिती गठीत करणेबाबतचे निर्देश दिनांक 29/08/2022 रोजीच्या बैठकीमध्ये देण्यात आले होते. तथापि अदयापही उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी समिती गठन झालेबाबतचा आदेश या कार्यालयाकडे सादर केलेला नाही. उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी समितीमध्ये तांत्रिक बाबींचे ज्ञान असलेले अधिकारी/कर्मचारी हे सदस्य म्हणुन नियुक्त करणेचे आहेत. तरी उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी तात्काळ समिती गठन झालेबाबतचा आदेश या कार्यालयाकडे सादर करावा तसेच वाहतूकीची पध्दत (Methodology) व मागदर्शक तत्वे यांची निश्चिती करून बांधकाम विभाग व या कार्यालयास सादर करावी अशा सूचना उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना अध्यक्ष यांनी दिल्या.

b) <u>सीआरझेड क्षेत्राचे बाहेर असलेली व पर्यावरण पुरक जागेची निश्चिती करणे - गटविकास अधिकारी दापोली व तहसीलदर दापोली</u>

प्रदुषण दृष्टया सुयोग्य जागा व निसर्गास प्रदुषणदृष्टया कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही तसेच सीआरझेड क्षेत्राचे बाहेर असलेली व पर्यावरण पुरक जागा अंतिम केलेनंतर, उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळुण यांचे ना-हरकत प्रमाणपत्रासह अहवाल सादर करणेबाबतचे निर्देश गटविकास अधिकारी दापोली व तहसीलदर दापोली यांना दिनांक 26/09/2022 रोजीच्या बैठकीमध्ये देण्यात आले होते. त्यानुषंगाने Construction and Demolition Waste Management Rules, 2016 मध्ये नमुद तरतुदींनुसार ना-हरकत प्रमाणपत्रासाठीचा Form-1 साठी तहसीलदार कार्यालयामार्फत नोंदणी (Registration) करण्यात आलेली असलेबाबत तहसीलदार दापोली यांनी सांगितले. ना-हरकत प्रमाणपत्रासाठी आवश्यक तांत्रिक बाबींची पुर्तता करून घेवुन दोन दिवसात ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त

करुन घेणेबाबतच्या सूचना सदस्य सचिव यांनी दिल्या. याकामी प्रदुषण नियंत्रण मंडळाने संगणकीय तसेच तांत्रिक बाबींमध्ये सर्वतोपरी सहकार्य करुन ना-हरकत दाखला देणेबाबत कार्यवाही करणेच्या सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

**c) अंदाजपत्रकांप्रमाणे निधी उपलबधतेबाबत -**

अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी यांनी साई रिसॉर्ट व सी कौंच या दोन्ही इमारतींचे बांधकाम निष्कासन करणे, तयार होणारा मलबा वाहतूक करणे व क्षेत्र पुनर्संचयित करणे इत्यादी बाबतचे रक्कम रु. 91.78 लक्ष चे अंदाजपत्रक व विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, रत्नागिरी यांनी निष्कासनाचे ठिकाणी आणि मलबा ज्या ठिकाणी टाकणेत येणार आहे त्या ठिकाणी वृक्षलागवड करणे व त्यांची 5 वर्षापर्यंत निगा/देखभाल राखणे व झाडांचे संरक्षण करणे इत्यादी बाबतचे रक्कम रु. 9.47 लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक दिनांक 03/10/2022 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केले आहे.

सदरची दोन्ही अंदाजपत्रके पुढील मान्यतेसाठी व निधी उपलब्धतेसाठी मा. संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे सादर करणे अत्यावश्यक असलेमुळे जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितीची पुर्व मंजुरी न घेता या कार्यालयाकडील दिनांक 06/10/2022 रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आली आहेत. तरी सदर अंदाजपत्रके निधी उपलब्धतेसाठी पाठविलेल्या प्रस्तावास समितीची कार्योत्तर मंजुरी आजचे बैठकीमध्ये घेण्यात येत आहे. तरी कार्योत्तर मंजुरीबाबत कोणास काही शंका असल्यास त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नसल्यामुळे कार्योत्तर मंजुरी मिळालेचे गृहित धरण्यात आले आहे.

उक्त दोन्ही अंदाजपत्रकांप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयाचे तहसीलदार सर्वसाधारण, रत्नागिरी तथा आहरण संवितरण अधिकारी यांचे नांवे अस्तित्वात असलेल्या बँक खात्यात रक्कम हस्तांतरीत करण्यात आलेबाबत मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग यांनी दिनांक 12/10/2022 रोजीचे पत्रान्वये (ई-मेल द्वारे प्राप्त) या कार्यालयास कळविले आहे. त्याप्रमाणे रक्कम रु. 91,78,000/- (अक्षरी रु. एक्याण्णव लाख अठ्याहत्तर हजार मात्र) व रु. 9,47,000/- (अक्षरी रु. नऊ लाख सत्तेचाळीस हजार मात्र) इतका निधी जमा झालेबाबत समितीस अवगत करण्यात आले.

**d) मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडील दिनांक 12/10/2022 रोजीचे पत्राबाबत -**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट चे बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. एमसीझेडएमए, मंत्रालय, मुंबई यांनी या कार्यालयास पाठविलेल्या दिनांक 12/08/2022 रोजीच्या निर्देशाचे वाचन करण्यात आले. सदर पत्रामध्ये पुढील प्रमाणे नमुद करण्यात आले आहे.

i) पर्यावरण विभागाकडे अंदाजपत्रक मंजूर करण्याचे कोणतेही आदेश नाहीत. त्याबाबतची आवश्यक मान्यता सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केली जाईल.
ii) 12 सप्टेंबर 2022 रोजी झालेल्या MCZMA च्या 160 व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार MOEFCC च्या दिनांक 22.08.2022 च्या आदेशाच्या अंमलबजावणीनंतर, प्रकल्प प्रस्तावकांकडून सदर रक्कम वसूल करून MCZMA कडे जमा करावी असे निर्देश आहेत.

प्रकरणी निष्कासीत करावयाच्या दोन इमारतींपैकी साई रिसॉर्ट यांचे बांधकाम निष्कासीत करणेबाबत मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 मध्ये मा. न्यायालयाने दिनांक 19/07/20201 चे आदेशान्वये जैसे-थे चे आदेश पारित केले आहेत. तसेच संबंधित जमीन मालक यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. 11125/2022 दाखल केली आहे. त्यांमुळे साई रिसॉर्टचे बांधकामाविरुध्द तात्काळ कार्यवाही सदयस्थितीत करता येणार नसलेने साई रिसॉर्ट व सी कौंच या दोन्ही बांधकामाच्या निष्कासनाच्या पुर्ण प्रक्रियेसाठीच्या खर्चाबाबतची दोन स्वतंत्र अंदाजपत्रके करणे आवश्यक आहे.

तसेच उक्त सर्व कार्यवाही पुर्ण करणेसाठी खर्च झालेली रक्कम संबंधित प्रकल्प प्रस्तावकांकडून वसुल करणेची असलेमुळे सार्वजनिक बांधकाम विभाग व सामाजिक वनीकरण विभाग यांनी साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच या दोन स्वतंत्र इमारतीसाठी दोन स्वतंत्र अंदाजपत्रके तयार करुन या कार्यालयाकडे दोन दिवसात सादर करावीत.

सदर स्वतंत्र अंदाजपत्रकांप्रमाणे संबंधित प्रकल्प प्रस्तावकांना त्यांचेकडुन वसुल करावयाच्या खर्चाची गणना करुन उपविभागीय अधिकारी दापोली यांनी रक्कम कळवावी असे समितीमध्ये सर्वानुमते मान्य करण्यात आले.

e) <u>सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी करावयाच्या निविदा प्रक्रियेबाबत -</u>

अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी यांनी साई रिसॉर्ट व सी कौंच या दोन्ही इमारतींचे बांधकाम निष्कासन करणे, तयार होणारा मलबा वाहतूक करणे व क्षेत्र पुनर्संचयित करणे इत्यादी बाबतचे रक्कम रु. 91.78 लक्ष चे एकत्रीत अंदाजपत्रक दिनांक 03/10/2022 रोजी या कार्यालयास सादर केले आहे. तथापि साई रिसॉर्ट व सी कौंच रिसॉर्ट या स्वतंत्र इमारतीसाठी दोन स्वतंत्र अंदाजपत्रके तयार करणेत यावीत अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकामाबाबत मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 मध्ये मा. न्यायालयाने दिनांक 19/07/20201 चे आदेशान्वये जैसे-थे चे आदेश पारित केलेले असल्यामुळे अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी यांनी साई रिसॉर्ट एनएक्स बाबत सशर्त निविदा मा. दिवाणी न्यायालय, व-स्तर, खेड यांच्या जैसे-थे च्या न्यायनिर्णयास अधीन राहून काढणे संयुक्तीक होणार आहे.

सबब दोन स्वतंत्र अंदाजपत्रकांप्रमाणे दोन स्वतंत्र निविदा - 1 निविदा सशर्त : मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकामाबाबत दाखल दावा क्र. 57/2021 चे अनुषंगाने व 1 निविदा - सी कौंच या टायटल क्लीअर असलेल्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने काढणेबाबत निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. सदर निविदा प्रक्रियेसाठी व निविदा प्रक्रियेनंतर कार्यवाही पुर्ण करणेकामी आवश्यक त्या मान्यता सार्वजनिक बांधकाम विभागाने द्यावयाच्या आहेत.

f) <u>न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही -</u>

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामाबाबत कारवाईचे अनुषंगाने दाखल दाव्यांमध्ये कायदेशीर बाबींचे दृष्टीने आवश्यक ते न्यायालयीन कामकाज

उपविभागीय अधिकारी दापोली, उपविभाग दापोली यांनी पहावयाचे आहे, अशा सूचना सदस्य सचिव यांनी दिल्या.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील सं.नं. 446 मधील साई रिसॉर्टचे बांधकाम निष्कासीत करणेच्या अनुषंगाने मा. दिवाणी न्यायालय, व-स्तर,खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 मधील सध्याचे वकील ॲड. श्रीम. एम.एम.जाडकर, सहाय्यक सरकारी अभियोक्ता, खेड यांचेऐवजी अन्य वकीलांची नेमणुक होऊन मिळणेबाबत उपविभागीय अधिकारी दापोली यांनी विनंती केली. सदर विनंतीस अनुसरुन ॲड. श्रीम. एम.एम.जाडकर, सहाय्यक सरकारी अभियोक्ता, खेड यांचेऐवजी ॲड. श्री. पी.आर.साळवी, सहा. सरकारी वकील, रत्नागिरी, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांची नियुक्ती करणेत आली.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नाही.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेले बांधकाम निष्कासनाचे दृष्टीने पुढीलप्रमाणे सर्वसाधारण सूचना देण्यात आल्या -

- बांधकाम निष्कासनाची कार्यवाही मा. MOEF&CC, नवी दिल्ली यांजकडील दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देशानुसार पुर्ण करावयाची असलेमुळे संबंधित सर्व विभाग/यंत्रणा यांनी त्यांना सभेमध्ये देणेत आलेल्या सूचनांनुसार कार्यवाही विहित मुदतीत करावी.

- बांधकाम निष्कासनाच्या प्रक्रियेमध्ये निसर्गास प्रदुषणदृष्टया (पाणी, हवा इ.) कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही व निसर्गाचा समतोल राखुन संपूर्ण प्रक्रिया पर्यावरण पुरक पध्दतीने (Eco-Friendly) पार पाडणेसाठी प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत गठीत केलेल्या समितीमध्ये जास्तीत जास्त तांत्रिकबाबीचे ज्ञान असलेल्या तज्ञ सदस्यांचा (Expert Member) समावेश करावा. सदर समितीमध्ये प्रदुषण नियंत्रण मंडळाने अध्यक्ष म्हणुन कामकाज पहावयाचे आहे. उपविभागीय अधिकारी दापोली हे समितीच्या कार्यवाहीवर देखरेख व नियंत्रण करतील. मात्र सर्व कार्यवाही ही प्रदुषण नियंत्रण मंडळाने पार पाडणेची आहे. सदरचे निष्कासन नियोजनपुर्वक व नेमलेल्या समितीच्या अधिपत्याखाली व मार्गदर्शन घेवुन पूर्ण करावे अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

**बांधकाम निष्कासन करणेचे कार्यवाहीबाबत उपस्थित मुद्दयांच्या अनुषंगाने सर्वसाधारण सूचना -**

1. कार्यकारी अभियंता, चिपळूण सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांनी मौजे मुरुड, ता. दापोली येथील साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट या दोन इमारतींची मोजमापे घेऊन त्याचे सविस्तर नकाशे तयार करुन प्रमाणिकरणासाठी सहाय्यक संचालक, नगर रचनाकार, रत्नागिरी यांजकडे पाठविले असुन देखील नकाशे प्रमाणित करुन न मिळालेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीचे निदर्शनास आणून दिले. सहाय्यक संचालक, नगर रचनाकार, रत्नागिरी यांनी दोन दिवसात नकाशे प्रमाणित करणेबाबत कार्यवाही पुर्ण करावी.

2. मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 मधील बांधकामे निष्कासन करताना साई रिसॉर्ट व सी कौंच या दोनही इमारतींच्या चहूबाजूने जेसीबी, डंपर व इतर मशिनरी फिरणेसाठी 15 मीटर जागेमधील तसेच पोहोच रस्त्याच्या बाहेर 7.50 मीटर रुंदीमध्ये कांदळवन अथवा संरक्षीत प्रजातीच्या वनस्पती तसेच संरक्षित वन्यप्राणी व समुद्री जीवांचे वास्तव्य नसलेचे प्रमाणपत्र परिक्षेत्र वन अधिकारी दापोली यांनी दिलेले नसलेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीचे निदर्शनास आणून दिले. विभागीय वन अधिकारी (चिपळूण), रत्नागिरी व परिक्षेत्र वन अधिकारी दापोली यांनी दोन दिवसात आवश्यक ते प्रमाणपत्र निर्गमीत करणेबाबत कार्यवाही पुर्ण करावी.

## 2. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

या कार्यालयाकडे मा. एमसीझेडएमए, पर्यावरण विभाग, मुंबई तसेच नागरिकांकडून सीआरझेड क्षेत्रामध्ये विनापरवाना बांधकाम केलेबाबत तक्रारी प्राप्त होत असतात. उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. -

| उपविभाग | माहे डिसेंबर 2021 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2022 ते ऑगस्ट 22 अखेर प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागी अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 14 | 2 | 16 | 3 | 13 | 3 | 10 | 6 | 4 |
| खेड | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 1 |
| चिपळूण | 8 | 0 | 8 | 3 | 5 | 2 | 3 | 2 | 1 |
| रत्नागिरी | 10 | 4 | 14 | 0 | 14 | 2 | 12 | 9 | 3 |
| राजापूर | 4 | 1 | 5 | 0 | 5 | 1 | 4 | 1 | 3 |
| | **36** | **8** | **44** | **6** | **38** | **8** | **30** | **18** | **12** |

| उपविभाग | MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या | अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या |
|---|---|---|---|
| दापोली | 2 | 8 | 10 |
| खेड | 0 | 1 | 1 |
| चिपळूण | 1 | 2 | 3 |
| रत्नागिरी | 2 | 10 | 12 |
| राजापूर | 1 | 3 | 4 |
| | **6** | **24** | **30** |

तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन अहवाल तात्काळ सादर करता येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे निर्देश सदस्य सचिव यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिले.

**प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना -**

1. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.
2. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.
3. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.
4. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

**<u>सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना -</u>**

1. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.
2. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
3. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.
4. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अॅथोरिटी किंवा कैंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.
5. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
6. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अॅथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
7. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.
8. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झालेचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या स्वाक्षरीची असे.**

क्र. महसूल/कार्या/अे.के. 6/DCZMA/10/2022
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - 18/10/2022

**(श्रीकांत गायकवाड)**
**सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती**
**रत्नागिरी तथा, निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी**

प्रतिलिपी - सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

# दिनांक 14/11/2022 रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. दवारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| 4. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| 5. | विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 6. | प्रतिनिधी सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| 7. | सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| 8. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| 9. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| 10. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| 11. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 12. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| 13. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| 14. | प्रतिनिधी मुख्याधिकारी, नगर परिषद रत्नागिरी | सदस्य |
| 15. | मुख्याधिकारी खेड | सदस्य |
| 16. | मुख्याधिकारी दापोली/ अतिरिक्त गुहागर | सदस्य |

तसेच वरील समिती सदस्यां व्यतिरीक्त अन्य संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना बैठकीस उपस्थित रहाणेबाबत कळविणेत आलेमुळे खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी हे प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे बैठकीस उपस्थित राहिलेले आहेत.

1. प्रतिनिधी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लिमि. रत्नागिरी
2. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण रत्नागिरी
3. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम चिपळूण
4. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद रत्नागिरी
5. तहसीलदार दापोली
6. जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन रत्नागिरी

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत. त्याअनुषंगाने दिनांक 26/09/2022 रोजी आयोजित बैठकीच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले. सदर इतिवृत्तामध्ये दिलेल्या निर्देशांचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित विभाग/यंत्रणा यांनी समितीस अवगत करावे अशी विनंती सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी केली.

**1. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट-साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट व रस्त्याचे केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत -**

**a) समिती गठन - विभाग प्रदुषण नियंत्रण मंडळ**

बांधकाम निष्कासन, मलबा वाहतूक आणि विल्हेवाट लावणे यासह क्षेत्र पुनर्संचयित करणे/ आसपासच्या वातावरणाच्या अनुषंगाने क्षेत्र विकसित करणे या प्रत्येक कामी निसर्गास प्रदुषणदृष्टया कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही व निसर्गाचा समतोल राखता यावी यासाठी उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी तात्काळ समिती गठीत करणेबाबतचे निर्देश दिनांक 29/08/2022 रोजीच्या बैठकीमध्ये देण्यात आले होते. तथापि अदयापही उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी समिती गठन झालेबाबतचा आदेश या कार्यालयाकडे सादर केलेला नाही. उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी समितीमध्ये तांत्रिक बाबींचे ज्ञान असलेले अधिकारी/कर्मचारी हे सदस्य म्हणुन नियुक्त करणेचे आहेत, अशा सूचना उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना दिनांक 29/08/2022, दिनांक 26/09/2022 दिनांक 17/10/2022 रोजीच्या बैठकीमध्ये देण्यात आल्या होत्या.

उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांचेमार्फत समिती गठीत करण्यात आलेली असुन समिती गठन झालेबाबतचा दिनांक 20/10/2022 रोजीचा आदेश या कार्यालयास प्राप्त झालेला असलेबाबत सदस्य सचिव यांनी समितीस सांगितले.

**b) सीआरझेड क्षेत्राचे बाहेर असलेली व पर्यावरण पुरक जागेची निश्चिती करणे - गटविकास अधिकारी दापोली व तहसीलदार दापोली**

बांधकाम निष्कासन झालेनंतर तयार होणा-या मलबा ची विल्हेवाट लावणेसाठी मौजे वाघावे, ता. दापोली येथील स.नं. 25 हि.नं. 10/3 प्रस्तावित करण्यात आलेली आले. तरी सदरची जागा प्रदुषण दृष्टया सुयोग्य जागा व निसर्गास प्रदुषणदृष्टया कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही तसेच सीआरझेड क्षेत्राचे बाहेर असुन पर्यावरण पुरक असलेबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमीत करणेची [illegible] उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळुण यांनी तात्काळ पुर्ण करुन बांधकाम विभागास ना-हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देवुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करणेचे निर्देश अध्यक्ष यांनी प्रदुषण विभागास दिले.

c) **<u>सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निर्गमित केलेल्या निविदा प्रक्रियेबाबत -</u>**

कार्यकारी अभियंता, चिपळूण, सा.बां. विभाग चिपळूण यांनी दिनांक 03/11/2022 रोजीचे पत्रान्वये अहवाल सादर केला असून, सदर अहवालान्वये उक्त प्रकरणी ऑनलाईन निविदा सूचना दिनांक 20/10/2022 रोजी प्रसिध्द केलेली आहे. सदर निविदेमध्ये ऑनलाईन निविदा विक्रीचा अंतिम दिनांक 10/11/2022 रोजी सायं. 18.00 वाजेपर्यंत आहे. तसेच ऑनलाईन निविदा उघडण्याचा दिनांक 14/11/2022 रोजी सकाळी 10.00 वाजलेपासून आहे. याबाबत समितीस अवगत करण्यात आले.

उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळुण यांचेमार्फत ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर बांधकामा निष्कासनाबाबतचे कार्यारंभ आदेश (Work Order) न्यायिक बाबीस अनुसरुन देणेची कार्यवाही बांधकाम विभागाने करणेची असलेबाबत अध्यक्ष यांनी निर्देश दिले.

d) **<u>मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडील दिनांक 12/10/2022 रोजीचे पत्राबाबत -</u>**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट चे बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. एमसीझेडएमए, मंत्रालय, मुंबई यांनी या कार्यालयास पाठविलेल्या दिनांक 12/08/2022 रोजीच्या निर्देशाचे वाचन करण्यात आले. सदर पत्रामध्ये पुढील प्रमाणे नमुद करण्यात आले आहे.

i) पर्यावरण विभागाकडे अंदाजपत्रक मंजूर करण्याचे कोणतेही आदेश नाहीत. त्याबाबतची आवश्यक मान्यता सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केली जाईल.

ii) 12 सप्टेंबर 2022 रोजी झालेल्या MCZMA च्या 160 व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार. MOEFCC च्या दिनांक 22.08.2022 च्या आदेशाच्या अंमलबजावणीनंतर, प्रकल्प प्रस्तावकांकडून सदर रक्कम वसूल करून MCZMA कडे जमा करावी असे निर्देश आहेत.

प्रकरणी निष्कासीत करावयाच्या दोन इमारतींपैकी साई रिसॉर्ट यांचे बांधकाम निष्कासीत करणेबाबत मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 मध्ये मा. न्यायालयाने दिनांक 19/07/20201 चे आदेशान्वये जैसे-थे चे आदेश पारित केले आहेत. तसेच संबंधित जमीन मालक यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. 11125/2022 दाखल केली आहे. त्यामुळे साई रिसॉर्टचे बांधकामाविरुध्द तात्काळ कार्यवाही सदयस्थितीत करता येणार नसलेने साई रिसॉर्ट व सी कौंच या दोन्ही बांधकामाच्या निष्कासनाच्या पुर्ण प्रक्रियेसाठीच्या खर्चाबाबतची दोन स्वतंत्र अंदाजपत्रके [illegible] आवश्यक आहे.

तसेच उक्त सर्व कार्यवाही पुर्ण करणेसाठी खर्च झालेली रक्कम संबंधित प्रकल्प प्रस्तावकांकडून वसुल करणेची असलेमुळे सार्वजनिक बांधकाम विभाग व सामाजिक वनीकरण विभाग यांनी साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच या दोन स्वतंत्र इमारतीसाठी दोन स्वतंत्र अंदाजपत्रके तयार करुन या कार्यालयाकडे दोन दिवसात सादर करावीत.

सदर स्वतंत्र अंदाजपत्रकांप्रमाणे संबंधित प्रकल्प प्रस्तावकांना त्यांचेकडुन वसुल करावयाच्या खर्चाची गणना करुन उपविभागीय अधिकारी दापोली यांनी रक्कम कळवावी असे समितीमध्ये सर्वानुमते मान्य करण्यात आले.

e) **बांधकाम निष्कासन करणेचे कार्यवाहीबाबत आवश्यक प्रमाणपत्रांबाबत -**

1. कार्यकारी अभियंता, चिपळूण सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांनी मौजे मुरुड, ता. दापोली येथील साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट या दोन इमारतींची मोजमापे घेऊन त्याचे सविस्तर नकाशे तयार करुन प्रमाणिकरणासाठी सहाय्यक संचालक, नगर रचनाकार, रत्नागिरी यांजकडे पाठविले असुन देखील नकाशे प्रमाणित करुन न मिळालेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने समितीचे निदर्शनास आणून दिले होते. सहाय्यक संचालक, नगर रचनाकार, रत्नागिरी यांना दोन दिवसात नकाशे प्रमाणित करणेबाबत कार्यवाही पुर्ण करणेबाबतच्या सुचना दिनांक 17/10/2022 रोजीच्या बैठकीमध्ये देणेत आल्या होत्या.

सहाय्यक संचालक, नगर रचनाकार, रत्नागिरी यांनी दिनांक 21/10/2022 रोजीच्या पत्रान्वये प्रत्यक्ष मोजमापानुसार नकाशे तयार करुन तेच नकाशे अदयावत समजणेत यावेत याबाबत कार्यकारी अभियंता चिपळूण यांना कळविण्यात आलेबाबत प्रतिनिधी, सहाय्यक संचालक, नगर रचनाकार, रत्नागिरी यांनी अध्यक्ष यांना सांगितले.

2. मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 मधील बांधकामे निष्कासन करताना साई रिसॉर्ट व सी कौंच या दोन्ही इमारतींच्या चहूबाजूने जेसीबी, डंपर व इतर मशिनरी फिरणेसाठी 15 मीटर जागेमधील तसेच पोहोच रस्त्याच्या बाहेर 7.50 मीटर रुंदीमध्ये कांदळवन अथवा संरक्षीत प्रजातीच्या वनस्पती तसेच संरक्षित वन्यप्राणी व समुद्री जीवांचे वास्तव्य नसलेचे प्रमाणपत्र परिक्षेत्र वन अधिकारी दापोली यांचेमार्फत दिनांक 11/11/2022 रोजीचे पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागास सादर करण्यात आले असलेचे विभागीय वन अधिकारी (चिपळूण), रत्नागिरी यांनी अध्यक्ष यांना सांगितले.

f) **न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही -**

i) श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी अपर जिल्हाधिकारी यांचे आदेशाविरुध्द मा. अपर आयुक्त, कोंकण विभाग, मुंबई यांचे न्यायालयात क्र.अपिल/डेस्क/एलएनडी/04/2022 अन्वये अपिल दाखल केले असून मा. अपर आयुक्त, कोंकण विभाग, मुंबई यांनी प्रस्तूत अपिलामध्ये दिनांक 06/06/2022 रोजी दिलेल्या आदेशानुसार सदरचा अपिल अर्ज महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 232 (2) अन्वये प्रकरण कसुरीच्या कारणास्तव खारीज करण्यात आलेले आहे. (dismissed in default)

ii) उपविभागीय अधिकारी दापोली यांजकडील दिनांक 12/09/2017 रोजीच्या आदेशान्वये बिनशेती अर्जदार यांना तळ+एक मजला बांधकाम क्षेत्र 502.68 चौ.मी. क्षेत्राची बांधकाम करणेस मंजुरी दिली आहे. परंतु सदयस्थितीमध्ये उक्त ठिकाणी तळ+दोन मजले असे बांधकाम दिसून येते व समुद्राच्या उच्चतम भरती रेषेपासून 500 मीटर अंतराच्या आत विनापरवाना निवासी व वाणिज्य बांधकाम केलेमुळे, उपविभागीय अधिकारी दापोली यांनी दिनांक 22/06/2021 रोजी सदरचे बांधकाम स्वत: निष्कासीत करावे. तसे न केल्यास सदरचे बांधकाम निष्कासनाबाबत कोणतीही पुर्वसूचना न देता कायदेशीर कारवाई करण्यात येईल आणि सदर कारवाईचा खर्च बांधकाम धारकाकडून वसूल करण्यात येईल अशी नोटीस नगर रचना अधिनियम 1966 मधील कम 56 व 53 मधील तरतुदीनुसार दिली.

सदर नोटीशीचे अनुषंगाने जमीन मालक श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी मा. दिवाणी न्यायालय खेड येथे दावा क्र. 57/2021 दिनांक 01/07/2021 अन्वये दाखल केला. मा. दिवाणी न्यायालय, खेड यांनी दिनांक 19/07/2021 रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुत दाव्यामध्ये जैसे-थे चे आदेश पारित केले आहेत.

मा. दिवाणी न्यायालय, खेड येथील दावा क्र. 57/2021 चे प्रकरणी मा. शासनातर्फे विहित मुदतीत म्हणणे दाखल न झालेमुळे यांनी दिनांक 11/02/2022 रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुत दावा विना कैफियत चालविणेबाबत आदेश केला आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक 01/07/2022 रोजी सदर दाव्यामध्ये परिच्छेदनिहाय कैफियत व म्हणणे तयार करुन मा. न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.

तद्नंतर दिनांक 01/09/2022 रोजीचे सुनावणीचे वेळी Civil procedure code 1908 order VII Rule 11(d) अंतर्गत वादीचा दावा फेटाळणेत/नाकारणेत यावा असा अर्ज दाखल करण्यात आला होता. तथापि दिनांक 11/10/2022 रोजीच्या सुनावणी आदेशान्वये सदरचा अर्ज रद्द करण्यात आला आहे.

सदर दाव्यामध्ये दिनांक 21/10/2022 रोजीच्या सुनावणी आदेशान्वये "विना कैफियत दावा चालविणेत यावा असा दिनांक 11/02/2022 रोजी पारित केलेला आदेश बाजुला ठेवण्यात (set-aside) आला आहे."

सदर दाव्यामध्ये दिनांक 11/11/2022 रोजीचे सुनावणीचे वेळी वादी तर्फे वकीलांचा युक्तीवाद सुरु करण्यात आलेला असुन पुढील युक्तीवादासाठी सुनावणीची तारीख दिनांक 18/11/2022 नेमणेत आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे जैसे-थे चे आदेश लागू असताना संबंधितांवर पोलिस ठाणे दापोली येथे गुन्हा नोंदविता येईल अगर कसे? याबाबत सहा. सरकारी वकील, रत्नागिरी यांनी दिवाणी न्यायालयाचा आदेश हा दिवाणी बाबी विषयी असून त्या आदेशाचा अंमल हा फौजदारी प्रकरणात किंवा फौजदारी तक्रार देण्यास प्रतिबंधीत होत नाही. दिवाणी कोर्टाचा जैसे-थे आदेश असताना पोलीस ठाण्यात फौजदारी कृत्याबाबत गुन्हा दाखल केल्यास दिवाणी कोर्टाचे आदेशाचा भंग व अवमान होत नाही असे मार्गदर्शन /अभिप्राय या कार्यालयास दिनांक 11/11/2022 रोजीचे पत्रान्वये सादर केले आहे.

सहा. सरकारी वकील, रत्नागिरी यांच्या उक्त अभिप्रायाचे अवलोकन केले असता, साई रिसॉर्टचे बांधकामाविरुध्द संबंधितांवर उपविभागीय अधिकारी दापोली, उपविभाग दापोली यांनी गुन्हा दाखल करणेबाबत समितीमध्ये निर्णय घेण्यात आला. तसे लेखी पत्र उपविभागीय अधिकारी दापोली, उपविभाग दापोली यांना तात्काळ देणेबाबतच्या सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

तसेच मा. विधी व न्याय विभागाकडील दिनांक 26/09/2022 रोजीचे पत्राचे अनुषंगाने या कार्यालयाकडील प्रस्ताव प्रशासकिय विभाग म्हणुन मा. एमसीझेडएमएमार्फत मार्गदर्शनासाठी मा. विधी व न्याय विभागास तात्काळ सादर करावा, असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

iii) श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं 446 मधील बांधकामाबाबत 58/2021 अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेमार्फत प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक 16/11/2022 रोजी निश्चित करण्यात आलेली आहे.

iv) मा. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, एकात्मिक प्रादेशिक कार्यालय, नागपुर द्वारा श्री. सुरेशकुमार अडप्पा, शास्त्रज्ञ-डी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, खेड यांचे न्यायालयात

1. श्री. अनिल दत्तात्रय परब, 2. साई रिसॉर्ट एनएक्स 3. सी कौंच रिसॉर्ट यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा अधिनियम 1986 मधील कलम 19 व 15 चे 7 अन्वये रेग्युलर क्रिमीनल केस नंबर 12/2022 अन्वये दावा दाखल केलेला आहे. सदर दावा आज मितीस न्यायप्रविष्ठ असुन पर्यावरण संरक्षण कायदा 1986 चे कलम 5 व 7 सह कलम 15 अंतर्गत शिक्षापात्र गुन्हयासाठी आरोपींविरुध्द समन्स काढणेबाबत आदेश करण्यात आला असुन, सदर दाव्यामध्ये दिनांक 14/12/2022 रोजी सुनावणी निश्चित करण्यात आलेली आहे.

v) मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स या रिसॉर्टचे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मुंबई यांचेकडील दिनांक 31/01/2022 चे ज्ञापन व अंमलबजावणी पत्र दिनांक 22/08/2022 व उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेकडील दिनांक 25/08/2022 चे पत्र रदद करण्याबाबत श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी भारत सरकार व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No.11125/2022 दाखल केले आहे. सदर दाव्यामध्ये पुढील सुनावणी दिनांक 24/11/2022 रोजी उच्च न्यायालय मुंबई येथे ठेवण्यात आली आहे.

vi) मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकाम पुर्ण नसताना कर आकारणी करणेसाठी श्री. अनिल दत्तात्रय परब यांनी अर्ज करुन शासनाची फसवणुक केलेमुळे गटविकास अधिकारी, पंचायत समिती दापोली यांनी श्री. अनिल दत्तात्रय परब व. 3 यांचेविरुध्द प्रथम खबर क्र. 0406 दिनांक 07/11/2022 अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नाही.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेले बांधकाम निष्कासनाचे दृष्टीने पुढीलप्रमाणे सर्वसाधारण सूचना देण्यात आल्या -

- बांधकाम निष्कासनाची कार्यवाही मा. MOEF&CC, नवी दिल्ली यांजकडील दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देशानुसार पुर्ण करावयाची असलेमुळे संबंधित सर्व विभाग/यंत्रणा यांनी त्यांना सभेमध्ये देणेत आलेल्या सूचनांनुसार कार्यवाही विहित मुदतीत करावी.

- बांधकाम निष्कासनाच्या प्रक्रियेमध्ये निसर्गास प्रदुषणदृष्टया (पाणी, हवा इ.) कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही व निसर्गाचा समतोल राखुन संपूर्ण प्रक्रिया पर्यावरण पुरक पध्दतीने (Eco-Friendly) पार पाडणेसाठी प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत गठीत केलेल्या समितीअंतर्गत तज्ञ सदस्यांच्या (Expert Member) मार्गदर्शनाखाली करावयाची आहे. उपविभागीय अधिकारी दापोली हे समितीच्या कार्यवाहीवर देखरेख व नियंत्रण करतील. मात्र सर्व कार्यवाही ही प्रदुषण नियंत्रण मंडळाने पार पाडणेची आहे. सदरचे निष्कासन नियोजनपुर्वक व नेमलेल्या समितीच्या अधिपत्याखाली व मार्गदर्शन घेवुन पूर्ण करावे अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

- उक्त बांधकाम प्रकरणी करावयाची कारवाई वेळोवेळी मा. न्यायालयाने पारित केलेल्या आदेशास अधिन राहून करावी.

## 2. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

या कार्यालयाकडे मा. एमसीझेडएमए, पर्यावरण विभाग, मुंबई तसेच नागरिकांकडून सीआरझेड क्षेत्रामध्ये विनापरवाना बांधकाम केलेबाबत तक्रारी प्राप्त होत असतात. उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. -

| उपविभाग | माहे डिसेंबर 2021 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2022 ते ऑक्टोबर 22 मध्ये प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 14 | 2 | 16 | 3 | **13** | 3 | 10 | 6 | 4 |
| खेड | 0 | 1 | 1 | 0 | **1** | 0 | 1 | 0 | 1 |
| चिपळूण | 8 | 0 | 8 | 3 | **5** | 3 | 2 | 2 | 0 |
| रत्नागिरी | 10 | 4 | 14 | 0 | **14** | 2 | 12 | 9 | 3 |
| राजापूर | 4 | 1 | 5 | 0 | **5** | 1 | 4 | 1 | 3 |
| | **36** | **8** | **44** | **6** | **38** | **9** | **29** | **18** | **11** |

| **उपविभाग** | **MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **एकुण तक्रारींची संख्या** |
|---|---|---|---|
| दापोली | 2 | 8 | 10 |
| खेड | 0 | 1 | 1 |
| चिपळूण | 1 | 1 | 2 |
| रत्नागिरी | 2 | 10 | 12 |
| राजापूर | 1 | 3 | 4 |
| | **6** | **23** | **29** |

तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन अहवाल तात्काळ सादर करता येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे निर्देश सदस्य सचिव यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिले.

**प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना -**

1. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.
2. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.
3. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.

4. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.
5. ज्या प्रकरणी नगर रचना विभाग/ भूमी अभिलेख विभागांचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत त्या प्रकरणी संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही करावी.

**<u>सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना -</u>**

1. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.
2. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
3. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.
4. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जाबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.
5. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
6. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
7. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.
8. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झालेचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या स्वाक्षरीची असे.**

क्र. महसूल/कार्या/अे.के. 6/DCZMA/11/2022
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - 14/11/2022

**(श्रीकांत गायकवाड)**
**सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती**
**रत्नागिरी तथा, निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी**

प्रतिलिपी - सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

**दिनांक ०५/१२/२०२२ रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या (DCZMA) आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| ३. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| ४. | प्रतिनिधी विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ५. | प्रतिनिधी सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| ६. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| ७. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| ८. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| ९. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| १०. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| ११. | प्रतिनिधी उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| १२. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |
| १३. | प्रतिनिधी मुख्याधिकारी, नगर परिषद रत्नागिरी | सदस्य |
| १४. | मुख्याधिकारी दापोली/ अतिरिक्त गुहागर | सदस्य |

तसेच वरील समिती सदस्यां व्यतिरीक्त अन्य संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना बैठकीस उपस्थित रहाणेबाबत कळविणेत आलेमुळे खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी हे प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे बैठकीस उपस्थित राहिलेले आहेत.

१. प्रतिनिधी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ रत्नागिरी
२. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लिमि. रत्नागिरी
३. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण रत्नागिरी
४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम चिपळूण
५. तहसीलदार दापोली
६. प्रतिनिधी जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन रत्नागिरी

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं ४४६ मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक २२/०८/२०२२ रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग,

मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक २५/०८/२०२२ रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत. सदर पत्राचे अनुषंगाने दिनांक २६/०९/२०२२, दिनांक १७/१०/२०२२ व दिनांक १४/११/२०२२ रोजी जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती (DCZMA) च्या बैठकीमध्ये समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले असून संबंधीत सर्व अधिकारी/यंत्रणा यांना कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

**१. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं ४४६ मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट-साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट व रस्त्याचे केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत -**

**a) मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडील दिनांक १२/१०/२०२२ रोजीचे पत्राबाबत –**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं ४४६ मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट चे बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. एमसीझेडएमए, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक १२/१०/२०२२ रोजीचे निर्देश या कार्यालयास प्राप्त झाले आहेत.

सदर पत्रामध्ये पुढील बाबी नमुद करण्यात आल्या आहेत.

i) पर्यावरण विभागाकडे अंदाजपत्रक मंजूर करण्याचे कोणतेही आदेश नाहीत. त्याबाबतची आवश्यक मान्यता सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केली जाईल.
ii) १२ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या MCZMA च्या १६० व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, MOEFCC च्या दिनांक २२.०८.२०२२ च्या आदेशाच्या अंमलबजावणीनंतर, प्रकल्प प्रस्तावकांकडून सदर रक्कम वसूल करून MCZMA कडे जमा करावी असे निर्देश आहेत.

प्रकरणी निष्कासीत करावयाच्या दोन इमारतींपैकी साई रिसॉर्ट यांचे बांधकाम निष्कासीत करणेबाबत मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. ५७/२०२१ मध्ये मा. न्यायालयाने दिनांक १९/०७/२०२०१ चे आदेशान्वये जैसे-थे चे आदेश पारित केले आहेत. तसेच संबंधित जमीन मालक यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ११११२५/२०२२ दाखल केली आहे. त्यामुळे साई रिसॉर्टचे बांधकामाविरुध्द तात्काळ कार्यवाही सदयस्थितीत करता येणार नसलेने साई रिसॉर्ट व सी कौंच या दोन्ही बांधकामाच्या निष्कासनाच्या पुर्ण प्रक्रियेसाठीच्या खर्चाबाबतची दोन स्वतंत्र अंदाजपत्रके करणे आवश्यक असलेबाबत यापुर्वीच संबंधित विभागाना निर्देश देण्यात आले आहेत.

त्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील दिनांक २१/११/२०२२ रोजीच्या अहवालानुसार साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांना अंदाजित वसुलपात्र रक्कम उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेमार्फत कळविणेत आलेली आहे.

सामाजिक वनीकरण विभाग यांनी अदयापपर्यंत दोन स्वतंत्र अंदाजपत्रके वारंवार सूचना/निर्देश देवुनही सादर का केलेली नाहीत याबाबत विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण यांना सदस्य सचिव यांनी विचारणा केली असता सामाजिक वनीकरण विभाग यांनी दोन स्वतंत्र अंदाजपत्रके जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केलेबाबत सांगितले.

सदर अंदाजपत्रकांप्रमाणे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांना वसुलपात्र रक्कम कळविणेसाठी उपविभागीय अधिकारी, दापोली यांना तात्काळ कळविणेत यावे असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

**b) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निर्गमित केलेल्या निविदा प्रक्रियेबाबत -**

कार्यकारी अभियंता, चिपळूण, सा.बां. विभाग चिपळूण यांचा ऑनलाईन निविदा प्रक्रियेबाबत दिनांक १५/११/२०२२ रोजीचा अहवाल या कार्यालयाकडे प्राप्त झाला असून त्यानुसार ऑनलाईन देकार उघडले असता मे. यश कन्स्ट्रक्शन प्रोप्रा. नंदकुमार सी. म्हात्रे, तळोजा यांचा देकार सर्वात कमी दराचा असलेने संबंधीत हे L१ निविदाकार ठरलेले आहेत. तसेच मे. यश कन्स्ट्रक्शन प्रोप्रा. नंदकुमार सी. म्हात्रे, तळोजा यांनी अतिरिक्त अनामत, सुरक्षा अनामत रक्कम व

उपयोगी साहित्याची रक्कम भरणा केलेबाबत कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, चिपळूण यांनी या कार्यालयास दिनांक २१/११/२०२२ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

### c) कार्यारंभ आदेशाबाबत –

सी कौंच रिसॉर्टचे बांधकाम निष्कासन करणेबाबत संबंधित प्रकल्प प्रस्तावकास अंदाजित रक्कम कळविणेत आलेनंतर कार्यारंभ आदेश देणेबाबत कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक २१/११/२०२२ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. त्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील अंदाजित रक्कम, उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेमार्फत सी कौंच रिसॉर्ट बांधकामाधारक यांना दिनांक २१/११/२०२२ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आली आहे. तसेच सी कौंच रिसॉर्टचे बांधकाम निष्कासन करणेबाबत मे. यश कन्स्ट्रक्शन प्रोप्रा. नंदकुमार सी. म्हात्रे, तळोजा यांना कार्यारंभ आदेश सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांचेमार्फत दिनांक २१/११/२०२२ रोजीचे पत्रान्वये देणेत आले आहेत.

तसेच साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेबाबत संबंधित प्रकल्प प्रस्तावकास अंदाजित रक्कम कळविणेत आलेनंतर व मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. ५७/२०२१ मध्ये निशाणी ६-तुर्तातुर्त ताकिदीच्या अर्जाच्या अनुषंगाने जैसे-थे चा पारित केलेला दिनांक १९/०७/२०२१ रोजीचा आदेश रद्द झालेनंतर साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेसाठी मे. यश कन्स्ट्रक्शन प्रोप्रा. नंदकुमार सी. म्हात्रे, तळोजा यांना कार्यारंभ आदेश देणेबाबत कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक २१/११/२०२२ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे.

मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. ५७/२०२१ मध्ये निशाणी ६-तुर्तातुर्त ताकिदीच्या अर्जाच्या अनुषंगाने जैसे-थे चा पारित केलेला दिनांक १९/०७/२०२१ रोजीचा आदेश रद्द झालेबाबत मा. दिवाणी न्यायालय, खेड यांनी आदेश पारित केल्यानंतर कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग चिपळूण यांना कळविणेबाबत उपविभागीय अधिकारी दापोली यांना अध्यक्ष यांनी निर्देश दिले. तद्नंतर साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेसाठी मे. यश कन्स्ट्रक्शन प्रोप्रा. नंदकुमार सी. म्हात्रे, तळोजा यांना कार्यारंभ आदेश देणेबाबत कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग चिपळूण यांनी पुढील योग्य ती कार्यवाही करावी. त्यासाठी या कार्यालयाकडे अथवा समितीकडे पुनश्च आदेश मागविणेची आवश्यकता नाही अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

### d) पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत –

सी कौंच रिसॉर्ट व साई रिसॉर्ट एनएक्स यांजकडून पर्यावरणीय नुकसान भरपाई (Environmental Compensation) वसूल करणेबाबची नोटीस दिनांक २८/०९/२०२२ रोजी संबंधितांना बजाविण्यात आली आहे, परंतू संबंधितांनी पर्यावरणीय नुकसान भरपाईची (Environmental Compensation) रक्कम जमा केलेली नसलेमुळे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नुकसान भरपाई भरणेसंदर्भात आदेश पारित करुन, सदर नुकसान भरपाई जमा करणेबाबत कारवाई करावी, असे प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ कोल्हापूर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास दिनांक ०१/१२/२०२२ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

तथापि पर्यावरणीय नुकसान भरपाईविषयी यापुर्वीच दिनांक २९/०८/२०२२ रोजीच्या जिल्हास्तरीय बैठकीमध्ये विचारविनिमय व सविस्तर चर्चा करणेत आली असून समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आला असून तो पुढीलप्रमाणे आहे -

- मा. MOEF&CC, नवी दिल्ली यांजकडील दिनांक २२/०८/२०२२ रोजीचे निर्देशांमधील परिच्छेद क्रमांक ८ मध्ये नमुद केलेप्रमाणे संयुक्त समितीने गणना केलेली पर्यावरणीय भरपाईची रक्कम CPCB चे गणनेप्रमाणे सुधारित करावी असे निर्देश आहेत. त्यामुळे पर्यावरणीय भरपाईची रक्कम CPCB चे गणनेप्रमाणे सुधारित करणेबाबत प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी CPCB व संयुक्त समितीशी समन्वय साधून योग्य ती कार्यवाही करावी असे निर्देश अध्यक्ष यांनी उपप्रादेशिक अधिकारी, प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळूण यांना दिले.

तरी वरीलप्रमाणे दिनांक २९/०८/२०२२ रोजीच्या जिल्हास्तरीय बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळानेच वसुलीची कार्यवाही करणे संयुक्तीक होणारे आहे.

तरी पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम वसुल करणेबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने त्यांचेकडील कायदयातील तरतूदीचे अनुषंगाने व नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

**e) न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही –**

i) श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी मा. दिवाणी न्यायालय खेड येथे दावा क्र. ५७/२०२१ दिनांक ०१/०७/२०२१ अन्वये दाखल केला. मा. दिवाणी न्यायालय, खेड यांनी दिनांक १९/०७/२०२१ रोजीच्या आदेशान्वये प्रस्तुत दाव्यामध्ये जैसे-थे चे आदेश पारित केले असून निशाण ६-तुर्तातुर्त ताकीद अर्जावरील निर्णयासाठी पुढील तारीख दिनांक १३/१२/२०२२ नेमणेत आली आहे.

ii) श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं ४४६ मधील बांधकामाबाबत ५८/२०२१ अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेमार्फत प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक १२/०१/२०२३ रोजी निश्चित करण्यात आलेली आहे.

iii) मा. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, एकात्मिक प्रादेशिक कार्यालय, नागपुर द्वारा श्री. सुरेशकुमार अडप्पा, शास्त्रज्ञ-डी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, खेड यांचे न्यायालयात १. श्री. अनिल दत्तात्रय परब, २. साई रिसॉर्ट एनएक्स ३. सी कौंच रिसॉर्ट यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा अधिनियम १९८६ मधील कलम १९ व १५ चे ७ अन्वये रेग्युलर क्रिमीनल केस नंबर १२/२०२२ अन्वये दावा दाखल केलेला आहे. सदर दावा आज मितीस न्यायप्रविष्ठ असुन पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम ५ व ७ सह कलम १५ अंतर्गत शिक्षापात्र गुन्हयासाठी आरोपींविरुध्द समन्स काढणेबाबत आदेश करण्यात आला असुन, सदर दाव्यामध्ये दिनांक १४/१२/२०२२ रोजी सुनावणी निश्चित करण्यात आलेली आहे.

iv) मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. ४४६ मधील साई रिसॉर्ट एनएक्स या रिसॉर्टचे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मुंबई यांचेकडील दिनांक ३१/०१/२०२२ चे ज्ञापन व अंमलबजावणी पत्र दिनांक २२/०८/२०२२ व उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेकडील दिनांक २५/०८/२०२२ चे पत्र रदद करण्याबाबत श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी भारत सरकार व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No.१११२५/२०२२ दाखल केले आहे. सदर दाव्यामध्ये पुढील सुनावणी दिनांक ०९/०१/२०२३ रोजी उच्च न्यायालय मुंबई येथे ठेवण्यात आली आहे.

v) मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. ४४६ मधील साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकाम पुर्ण नसताना कर आकारणी करणेसाठी श्री. अनिल दत्तात्रय परब यांनी अर्ज करुन शासनाची फसवणुक केलेमुळे गटविकास अधिकारी, पंचायत समिती दापोली यांनी श्री. अनिल दत्तात्रय परब व. ३ यांचेविरुध्द प्रथम खबर क्र. ०४०६ दिनांक ०७/११/२०२२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

vi) मौजे मुरूड, ता. दापोली येथील गट नं. ४४६ या मिळकतीमधील सी कौंच रिसॉर्टचे अनधिकृत बांधकाम केलेमुळे श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळे यांचेविरुध्द पोलीस ठाणे दापोली येथे गुन्हा प्रथम खबर क्रमांक ००४३ दिनांक - ०८.०३.२०२२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच मौजे मुरूड, ता. दापोली येथील गट नं. ४४६ या मिळकतीमधील साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकामाबाबत जमीन मालक श्री. सदानंद गंगाराम कदम यांचेवर मंडळ अधिकारी बुरोंडी यांचेमार्फत दापोली पोलीस ठाणे येथे गुन्हा प्रथम खबर क्र. ०१७८ दिनांक १४/११/२०२२ नुसार एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं ४४६ मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेले बांधकाम निष्कासनाचे दृष्टीने पुढीलप्रमाणे सर्वसाधारण सूचना देण्यात आल्या -

- बांधकाम निष्कासनाची कार्यवाही मा. MOEF&CC, नवी दिल्ली यांजकडील दिनांक २२/०८/२०२२ रोजीचे निर्देशानुसार पुर्ण करावयाची असलेमुळे संबंधित सर्व विभाग/यंत्रणा यांनी त्यांना सभेमध्ये देणेत आलेल्या सूचनांनुसार कार्यवाही विहित मुदतीत करावी.

- बांधकाम निष्कासनाच्या प्रक्रियेमध्ये निसर्गास प्रदुषणदृष्टया (पाणी, हवा इ.) कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही व निसर्गाचा समतोल राखुन संपूर्ण प्रक्रिया पर्यावरण पुरक पध्दतीने (Eco-Friendly) पार पाडणेसाठी प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत गठीत केलेल्या समितीअंतर्गत तज्ञ सदस्यांच्या (Expert Member) मार्गदर्शनाखाली करावयाची आहे. उपविभागीय अधिकारी दापोली हे समितीच्या कार्यवाहीवर देखरेख व नियंत्रण करतील. मात्र सर्व कार्यवाही ही प्रदुषण नियंत्रण मंडळाने पार पाडणेची आहे. सदरचे निष्कासन नियोजनपुर्वक व नेमलेल्या समितीच्या अधिपत्याखाली व मार्गदर्शन घेवुन पूर्ण करावे.

- उक्त बांधकाम प्रकरणी करावयाची कारवाई वेळोवेळी मा. न्यायालयाने पारित केलेल्या आदेशास अधिन राहून करावी.

- पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम संबंधितांकडून वसुल करणेसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने कायदयातील तरतूदींचे पालन करुन सर्वतोपरी प्रयत्न करावेत.

## २. मौजे मुरुड, ता. दापोली येथील समुद्र किना-यावरील साई रिसॉर्ट एनएक्स/ सी कौंच रिसॉर्ट यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेबाबत व भूमिगत ड्रेनेज पाईपलाईन बाबत - डॉ. किरीट सोमैया यांचा तक्रारी अर्ज

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं ४४६ लगत पश्चिम दिशेच्या समुद्रावरील वाळूवर अतिक्रमण करुन त्यावर सिमेंट कॉंक्रिटीकरण करुन पेव्हर ब्लॉक बसविले बाबत तसेच भूमिगत/जमिनीच्या खालून गटाराचे/सांडपाण्याचे पाईप समुद्रात सोडलेबाबत डॉ. किरीट सोमैया, माजी खासदार यांनी या कार्यालयाकडे तक्रार अर्ज सादर केला आहे. सदर प्रकरणी तक्रार अर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने स्थळपहाणी व चौकशी करुन तसेच नियमानुसार यथोचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी, दापोली यांना दिनांक २९/११/२०२२ रोजीचे पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत.

सदर प्रकरणी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळूण यांचा दिनांक २९/११/२०२२ रोजीचा स्थळपहाणी अहवाल पुढीलप्रमाणे आहे - मे. साई रिसॉर्ट व सी कौंच रिसॉर्ट या दोन्ही रिसॉर्टच्या समोरील बाजुस घरगुती सांडपाणी साठविण्याकरीता टाकी बांधण्यात आल्याचे आढळले. परंतू सदर घरगुती सांडपाणी समुद्राच्या दिशेने जात असल्याचे अथवा सोडल्याचे आढळून आले नाही. सदर घरगुती सांडपाणी साठवण टाकी भुमिगत असून सी कौंच रिसॉर्टच्या समोरील आवाराबाहेर व साई रिसॉर्टच्या आवाराच्या आतील बाजुस बांधण्यात आलेले आहेत, असा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांचा पाहणी अहवाल आहे.

उपविभागीय अधिकारी दापोली यांनी दिनांक ०३/१२/२०२२ रोजीचे पत्रान्वये अहवाल सादर केला असून सदर अवलोकन केले असता त्या मध्ये पुढीलप्रमाणे नमुद आहे - श्री. सदानंद गंगारम कदम, साई रिसॉर्ट व श्री. पुष्कर मुळये, सी कौंच रिसॉर्ट यांना म.ज.म.अ.१९६६ चे कलम ५०(३) व कलम ५३ नुसार नोटीस देऊन सदरचे बांधकाम ४८ तासाचे आत स्वखर्चाने काढून टाकणेबाबत व सदरची जमीन पुर्वस्थितीत आणून मोकळी करुन देणेबाबत कळविले होते. श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकामाचे समोर पश्चिमेकडील/ समुद्र किना-याकडील बाजुस गट क्र. ४४६ चे हद्दीचे बाहेर शासकीय जमिनीवर केलेले गाडी पार्कींग व गार्डनचे पेव्हर ब्लॉक/ लादी टाकुन केलेले बांधकाम व कंम्पाऊंड ची भिंतीचे बांधकाम काढुन टाकलेले आहे. सदयस्थितीत गट क्र. ४४६ मधील साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकामाचे समोर पश्चिमेकडील/ समुद्र किना-याकडील बाजुस गट क्र. ४४६ चे हद्दीचे बाहेर शासकीय जमिनीवर कसलेही बांधकाम दिसुन येत नाही. एक नारळाचे झाड व जमिनीवर लादीचा थोडासा भाग शिल्लक आहे. परंतु कुठलेही बांधकाम शिल्लक नाही. शासकीय जमिनीवरील बांधकामाचा काढणेत आलेला मलबा हा जमीन मालक यांनी त्यांचे गट नं. ४४६ मधील साई रिसॉर्ट एनएक्स चे बांधकामाचे मागील बाजुस त्यांचे मालकीचे क्षेत्रात टाकलेला आहे.

तसेच श्री. पुष्कर मुळये, सी कौंच रिसॉर्ट रा. मुरुड, ता. दापोली यांना दिलेल्या नोटीसनुसार सी कौंच रिसॉर्ट चे बांधकामाचे समोर पश्चिमेकडील/ समुद्र किना-याकडील बाजुस गट क्र. ४४६ चे हद्दीचे बाहेर शासकीय जमिनीवर केलेले पेव्हर ब्लॉक, लादी टाकुन गाडी पार्कींग, प्ले ग्राऊंड व तयार केलेले पोर्च चे बांधकाम व कंम्पाऊंड ची भिंतीचे बांधकाम

काढुन टाकलेले आहे. सदयस्थितीत गट क्र. ४४६ मधील सी कौंच रिसॉर्टचे बांधकामाचे समोर पश्चिमेकडील/ समुद्र किना-याकडील बाजुस गट क्र. ४४६ चे हद्दीचे बाहेर शासकीय जमिनीवर कसलेही बांधकाम दिसुन येत नाही. ड्रेनेजचे टाकीचा भाग बुजवणेचा थोडासा भाग शिल्लक आहे. परंतु कुठलेही बांधकाम शिल्लक नाही. शासकीय जमिनीवरील बांधकामचा काढणेत आलेला मलबा हा जमीन मालक यांनी त्यांचे गट नं. ४४६ मधील सी कौंच रिसॉर्ट चे बांधकामाचे मागील बाजुस असलेल्या क्षेत्रात टाकलेला आहे.

म.ज.म.अ.१९६६ चे कलम ५०(३) व कलम ५३ नुसार दिलेल्या नोटीसप्रमाणे संबंधितांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हे मुदतीत काढून टाकलेले आहे, असे दिसुन येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी संबंधितांनी शासकीय जमिनीमध्ये केलेले बांधकाम निष्कासीत केले असून त्यातील मलबा हा गट नं. ४४६ मध्ये टाकलेला आहे. गट नं. ४४६ मधील अस्तित्वातील बांधकामे ही सदयस्थितीत निष्कासनासाठी प्रस्तावित असलेने, उक्त मलबा हा गट नं. ४४६ मध्ये ठेवणे हे संयुक्तीक होणार नाही. तरी सदरचा मलबा हा नियोजीत जागा मौजे वाघवे, ता. दापोली येथील स.नं. २५ हि.नं. १०/३ मध्ये विल्हेवाटीसाठी त्यांचे स्वखर्चाने, निसर्गास प्रदुषणदृष्टया (पाणी, हवा इ.) कोणतीही बाधा/हानी पोहोचणार नाही व निसर्गाचा समतोल राखुन पर्यावरण पुरक पध्दतीने (Eco-Friendly) टाकावा असे संबंधितांना कळविणेबाबत तहसीलदार दापोली यांनी कार्यवाही करावी असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

तसेच मोजणी अंती निष्पन्न झालेले उक्त बांधकाम हे शासकीय जमिनीमध्ये आढळुन येत असलेमुळे, सदर बांधकामाबाबत संबंधितांवर पुढील कोणती कारवाई करावी अगर कसे? याबाबत उपविभागीय अधिकारी दापोली यांनी स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितीकडे सादर करावा. सदर अहवालाबाबत मा. एमसीझेडएमए, मंत्रालय, मुंबई यांजकडून मार्गदर्शन मागविणेची तसेच जरुरतर कायदेशीर सल्लामसलत करुन निर्णय घेणेची कार्यवाही जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात येईल अश्या सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

## ३. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

या कार्यालयाकडे मा. एमसीझेडएमए, पर्यावरण विभाग, मुंबई तसेच नागरिकांकडून सीआरझेड क्षेत्रामध्ये विनापरवाना बांधकाम केलेबाबत तक्रारी प्राप्त होत असतात. उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. –

| उपविभाग | माहे डिसेंबर २०२१ अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी २०२२ ते नोव्हेंबर २२ मध्ये प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | १४ | २ | १६ | ३ | **१३** | ३ | १० | ६ | ४ |
| खेड | ० | १ | १ | ० | **१** | ० | १ | ० | १ |
| चिपळूण | ८ | ० | ८ | ३ | **५** | ३ | २ | २ | ० |
| रत्नागिरी | १० | ४ | १४ | ० | **१४** | २ | १२ | ९ | ३ |
| राजापूर | ४ | १ | ५ | ० | **५** | १ | ४ | १ | ३ |
| | **३६** | **८** | **४४** | **६** | **३८** | **९** | **२९** | **१८** | **११** |

| **उपविभाग** | **MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **एकुण तक्रारींची संख्या** |
|---|---|---|---|
| दापोली | २ | ८ | १० |
| खेड | ० | १ | १ |
| चिपळूण | १ | १ | २ |

| | | | |
|---|---|---|---|
| रत्नागिरी | २ | १० | १२ |
| राजापूर | १ | ३ | ४ |
| | **६** | **२३** | **२९** |

**उपविभाग दापोली –**

१. मौजे हर्णे, ता. दापोली येथील ब्ल्यू ब्रिज प्रोजेक्टेचे संदर्भात अदयापही सहा. संचालक, नगर रचना रत्नागिरी यांनी वारंवार सूचना देवुनही अहवाल सादर केलेला नाही. तरी सदर प्रकरणी प्राधान्याने योग्य ती कार्यवाही करुन उपविभागीय अधिकारी दापोली यांना अहवाल सादर करावा.

२. मौजे तामसतिर्थ, ता. दापोली येथील गट नं. १/८ व १/११ मधील बांधकामाबाबत उप अधिक्षक, भूमी अभिलेख दापोली यांनी मोजणी नकाशा उपविभागीय अधिकारी दापोली यांना पुरविणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

**उपविभाग खेड –**

१. मौजे भरणेनाका, ता. खेड येथील स.नं. २१/ब मधील बांधकाम प्रकरणी नियोजीत मोजणीचे दिवशी उप अधिक्षक, भूमी अभिलेख खेड यांचेमार्फत मोजणीची कार्यवाही झालेली नाही, असे उपविभागीय अधिकारी खेड यांनी सांगितले. तरी सदर प्रकरणी प्राधान्याने मोजणीची कार्यवाही करुन उपविभागीय अधिकारी खेड यांना अहवाल सादर करावा.

**उपविभाग राजापूर –**

१. मौजे इंगळेवाडी नाणार, ता. राजापूर येथील बांधकाम प्रकरणी मोजणी नकाशा सादर करणेबाबत उप अधिक्षक, भूमी अभिलेख राजापूर यांना उपविभागीय अधिकारी राजापूर यांनी कळविले होते. तरी सदर प्रकरणी प्राधान्याने मोजणी नकाशा उपविभागीय अधिकारी राजापूर यांना सादर करावा.

वरील उपविभागातील मोजणी प्रकरणात तात्काळ कार्यवाही करणेच्या सूचना संबंधित उपअधिक्षक, भूमी अभिलेख यांना अधिक्षक, भूमी अभिलेख यांनी दयाव्यात.

**प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना –**

१. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.

२. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.

३. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.

४. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

५. ज्या प्रकरणी नगर रचना विभाग/ भूमी अभिलेख विभागांचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत त्या प्रकरणी संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही करावी.

**सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना –**

१. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.

२. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.

४. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.

५. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

६. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

७. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

८. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नाही.

उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झालेचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या स्वाक्षरीची असे.**

क्र. महसूल/कार्या/अे.के. ६/DCZMA/१२/२०२२
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - ०८/१२/२०२२

**(श्रीकांत गायकवाड)**
**सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती,**
**रत्नागिरी तथा निवासी उपजिल्हाधिकारी**

प्रतिलिपी – सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी